# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ४ सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹


## आज पंतप्रधान नरेंद्र मोदी जेएनपीएत

**उरण :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे गुरूवार, ४ सप्टेंबरला जेएनपीएत येणार आहेत. पंतप्रधान नवी मुंबईत येणार असल्याने प्रशासनासह भाजपच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे या कार्यक्रमात काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष लागून राहीले आहे. केंद्र सरकारच्या बंदर, नौवहन आणि जलमार्ग मंत्रालयाच्या वतीने जेएन पोर्ट पीएसए मुंबई टर्मिनलच्या (बीएमसीटी) दुसऱ्या टप्प्याचे उद्‌घाटन ४ सप्टेंबरला दुपारी १२ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.यावेळी सिंगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग हे उपस्थित असणार आहे. पान २ वर






### वेधक

## नेरळमध्ये चोरी

**नेरळ :** नेरळ शहरातील राजेंद्र गुरुनगर येथील अंबिका अपार्टमेंट इमारतीत चोरीची घटना घडली. गणेश संनगरे यांच्या पहिल्या मजल्यावरील घरात झालेल्या या चोरीत तब्बल ७ तोळे सोने व ६ लाख रुपये रोख रक्कम असा ऐवज लंपास झाला आहे.घरातील सदस्य मंगळवारी सकाळी १० वाजता गणेश दर्शनासाठी बाहेर गेल्याची संधी साधून अज्ञात चोरट्याने घरच्या दाराचे कुलूप फोडून घरात प्रवेश केला. तसेच लोखंडी कपाटातील लॉकर फोडले. यामधून दोन गंठण, कानातले, चैन, ब्रेसलेट, अंगठी अशा दागिन्यांसह रोकड असा मोठा ऐवज चोरून नेला. चोरीसाठी वापरलेला लोखंडी रॉड इमारतीच्या जिन्याच्या कोपऱ्यात काही अंतरावर पोलिसांना आढळून आला आहे. चोरीची माहिती मिळताच नेरळ पोलीस ठाण्यात पान २ वर

## ग्राहकांची हॉटेल मालकास मारहाण

**पोलादपूर :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ लगत पारले गावाच्या हद्दीमध्ये असलेल्या हॉटेलमध्ये गर्दीच्या वेळी हॉटेल मालकास मारहाण झाल्याची घटना मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. तीन आरोपींविरुद्ध पोलादपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ लगतच्या पार्ले गावामध्ये मनस्वाद हॉटेल येथे ग्राहकांची गर्दी असताना तुर्भे बुद्रुक गावातील तिघे तरुण मंगळवारी रात्री सव्वा अकरा वाजण्याच्या सुमारास जेवण्यासाठी गेले असता हॉटेल मालक मनोज विठोबा शिबुगडे (रा. चरई, साळवीवाडी, ता. पोलादपूर) यांनी पान २ वर

## अफगाणिस्तान उद्‌ध्वस्त

**अफगाणिस्तान :** अफगाणिस्तानच्या पूर्वेकडील भागात झालेल्या ६.० तीव्रतेच्या भूकंपामुळे मोठी जीवितहानी झाली आहे. कुनार प्रांतात आतापर्यंत १ हजार ४११ लोकांचा मृत्यू झाला असून ३ हजार १२४ लोक जखमी झाले आहेत, अशी माहिती तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी दिली आहे. या भूकंपाने अनेक गावांमधील घरे पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाली आहेत. संयुक्त राष्ट्रांनी मृतांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. भारताने या संकटाच्या स्थितीत तातडीने मदत पाठवली आहे. तालिबान सरकारचे प्रवक्ते जबीहुल्लाह मुजाहिद यांनी दिलेला आकडा फक्त कुनार प्रांतातील आहे.

# जिद्दीने कामाला लागा

### शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांचे आवाहन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**शेतकरी कामगार पक्षाने ज्यांना मोठे केले, त्यांनी पक्षाशी गद्दारी केली. त्या गद्दारांना शून्य बनविण्याची ताकद प्रत्येक कार्यकर्त्यांमध्ये आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका होणार आहेत. मतदान केंद्रस्तरावर काम करून मतदारापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. इंडिया आघाडीसह महाविकास आघाडीतर्फे आपण लढणार आहोत. जिल्हा परिषदेवर आपली सत्ता कायम राहिल, या दृष्टीने मोठ्या जिद्दीने, चिकाटीने, मनात चीड ठेवून वेगळ्या तऱ्हेने काम करण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.**




(छायाचित्र : समीर मालोदे)

### तालुका चिटणीसांकडून घेतला कामाचा आढावा

रायगड जिल्ह्यातील तालुका चिटणीस यांच्याकडून तालुकास्तरावर कामाचा आढावा बैठकीत घेण्यात आला. त्यांनी केलेल्या कामांसह बुथ व घरस्तरावर केलेल्या कामांची माहिती घेण्यात आली. अपूर्ण कामे आगामी काळात तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांनी केल्या.

शेतकरी कामगार पक्ष, रायगड जिल्हा चिटणीस मंडळ, नवनिर्वाचित पदाधिकारी, बैठक व चर्चासत्राचे आयोजन चेंढरे येथील पीएनपी नाट्यगृहात बुधवारी (दि.३) करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना जयंत पाटील बोलत होते.

यावेळी शेकापचे नेते माजी आ. बाळाराम पाटील, ज्येष्ठ नेते शंकराव म्हात्रे, द्वारकानाथ नाईक, जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप कार्यालयीन चिटणीस राजेंद्र कोरडे, राज्य खजिनदार अतूल म्हात्रे, कामगार आघाडी प्रमुख प्रदिप नाईक, शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे, शेकाप जिल्हा महिला आघाडी प्रमुख शिवानी जंगम, तेजस्विनी घरत, नारायण घरत, नाना सावंत, तालुका माजी चिटणीस अनिल पाटील, शंकरराव म्हसकर, पी.डी. पाटील, गणेश मढवी आदींसह जिल्ह्यातील तालुका चिटणीस, सभासद, महिला व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पान २ वर

# ओबीसी नेते आक्रमक

### हैदराबात गॅझेटच्या जीआरची होळी, ठिकठिकाणी आंदोलने

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मराठा आरक्षणासंदर्भात शासनाने काढलेल्या जीआर विरोधात जालन्यात ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. मराठा आरक्षणासंदर्भात काढलेल्या जीआर जालन्यात ओबीसी बांधवांनी फाडून पायदळी तुडवला. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची मागणी मान्य करत काल राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटचा जीआर काढला आहे. ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाची घुसखोरी होत असल्याचा आरोप ओबीसी समाजाकडून केला जात आहे. जीआर रद्द झाला न झाल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतील, असे म्हणत भोकर येथे आंदोलक आक्रमक झाल्याचं पाहायला मिळालं. हैदराबाद गॅजेटचा जीआर काढल्यानंतर आज भोकर येथे तहसील कार्यालय समोर ओबीसी आंदोलकांनी जीआरची होळी केली.

### ओबीसीसाठी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक

**ओबीसी समाजासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत केली जाणार असून आजच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये हा महत्त्वाचा निर्णय झाल्याचे समजते. मराठा आरक्षण संदर्भात शासन निर्णय काढल्यानंतर ओबीसी समाज आक्रमक झाल्यामुळे शासनाने ओबीसी समाजाची भूमिका लक्षात घेत पाऊले उचलली आहेत. आक्रमक ओबीसी समाजाला शांत करण्यासाठी शासनाकडून मोठा निर्णय घेण्यात येत आहे. ओबीसी समाजासाठी देखील ६ सदस्यीय मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्यात येत आहे. त्यासाठी, प्रत्येक पक्षातील दोन सदस्यांची नेमणूक करण्यात येईल. ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती आजच गठीत होणार असून आजच जीआरदेखील काढला जाणार असल्याची विश्वसनीय सूत्रांची माहिती आहे.**

राज्य सरकारने मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीवर सुवर्णमध्य साधला असून उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीनुसार हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. त्यामुळे, गेल्या ५ दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानावर सुरू असलेल्या आरक्षण आंदोलनाचा विजय झाल्याचं बोललं जात आहे.

शासनाने मागण्या मान्य केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्यासह मराठा बांधवांनी गुलालाची उधळण करत एकच जल्लोष केला. मात्र, या शासन निर्णयाने ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याची भावना व्यक्त करत ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. विशेष म्हणजे ओबीसी नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळ बैठकालाही दांडी मारली होती. त्यानंतर, आज राज्य शासनाने ओबीसी समाजासाठीही महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याची भूमिका घेत छगन भुजबळ यांनी मंत्रिमंडळ बैठकीवर बहिष्कार घातल्याचे वृत्त आहे. भुजबळांच्या नाराजी नंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील वरिष्ठ नेत्यांची तातडीची बैठक पान २ वर

## वृद्ध महिलेची हत्या करून केली चोरी !

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव जवळील कुंभे पुनर्वसन वसाहत भादाव येथील ७४ वर्षाच्या वृद्ध महिलेची तिच्याच राहत्या घरात अज्ञात चोरट्यांनी शिरून तिची हत्या करून सोन्याचे दागिने घेऊन चोरटा पसार झाल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले असून रायगड पोलीस चक्रावून गेले आहेत.

माणगाव तालुक्यातील भादाव गावाजवळ असणाऱ्या कुंभे पूर्नवसन वसाहत भादाव येथे शांताबाई शंकर कांबळे वय वर्ष ७४ ह्या राहत होत्या. १ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपासून ता. २ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी पान २ वर

# शेकापतर्फे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

### माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या, माजी राज्यमंत्री स्व. मीनाक्षी पाटील यांच्या जयंतीनिमित्त अलिबागमध्ये शेतकरी भवन येथे शनिवारी (दि.१३) जिल्हास्तरीय खुल्या वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. विजेत्यांना मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वक्तृत्व करंडक २०२५ देऊन गौरविण्यात येणार आहे.

शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या स्व. मीनाक्षी पाटील यांचे राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. विधानसभेत आमदारपासून ते राज्यमंत्री म्हणून त्यांनी सक्षमपणे भूमिका बजावली आहे. आपल्या वक्तृत्वाने सभागृहाला आणि सरकारला प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी भाग पान २ वर

# अकरावी प्रवेश प्रक्रिया लांबणीवर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

ऑगस्ट अखेरीस सुरू झालेली दुसरी विशेष फेरी अकरावी प्रवेशाची अंतिम फेरी असेल, असे जाहीर केल्यानंतर शिक्षण संचालनालयाकडून प्रवेश प्रक्रियेची आणखी एक फेरी घेण्यात येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक मंगळवारी जाहीर करण्यात आले असून, ३ सप्टेंबरपासून विद्यार्थ्यांना नोंदणी करता येईल. दरम्यान, आतापर्यंत प्रवेश अर्जाचे दोन्ही भाग भरणाऱ्या १३ लाख ४३ हजार ९६९ पैकी १३ लाख १२ हजार ७८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत.

अकरावी प्रवेशाच्या चार नियमित आणि दोन अतिरिक्त विशेष फेऱ्यांची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाली. त्यापैकी दुसऱ्या विशेष फेरीत कला शाखेसाठी १० हजार ७४७, वाणिज्य शाखेसाठी १० हजार ७१९ आणि विज्ञान शाखेसाठी १६ हजार ३८७ अशा एकूण ३८ हजार ८५३ विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी मिळाली होती. त्यापैकी ३७ हजार ०७४ विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले. आता अर्जाचे भाग एक आणि दोन निश्चित करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी फक्त ३१ हजार विद्यार्थी प्रवेशापासून वंचित आहेत.या विद्यार्थ्यांसाठी आणखी एक फेरी राबवण्यात येणार असून ३ सप्टेंबरला नवीन पान २ वर

## विसर्जनासाठी गेलेल्या भक्ताचा मृत्यू

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

विसर्जनासाठी गेलेल्या एका ४५ वर्षीय इसमाचा तलावात बुडून मृत्यू झाला. अथक प्रयत्नानंतर अखेर बुधवारी (दि.३) सायंकाळी त्याचा मृतदेह सापडला. ही घटना झिराड येथील असून रोहा रेस्क्यू टिमच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात यश आले.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सात दिवसांच्या गणेशमूर्तीचे विसर्जन मंगळवारी सायंकाळी झिराड येथील तलावात सुरू होते. अनिल बुधा नाईक (वय ४५, रा. आदिवासीवाडी झिराड) हा ठाकुर आळी येथील तलावात गणेशमूर्ती विसर्जन करण्याचे काम करीत होता. त्याला पोहता येत होते. गणेशमूर्ती विसर्जन करुन पाण्यात पोहत पान २ वर

# दिवीवाडीतील महिलेची हत्या

### आपआपसात वाद झाल्याने रागाच्या भरात दोरीने दाबला गळा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील महाजने येथील दिवीवाडीमधील एका ३८ वर्षीय महिलेची हत्या करण्यात आली. ही घटना सोमवार ते मंगळवारच्या दरम्यान घडली आहे. आपापसात वाद झाल्याने आरोपीने रागाच्या भरात दोरीने गळा दाबून ठार मारल्याची माहिती उपलब्ध झाली आहे. याप्रकरणी रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार अर्चना चंद्रकांत नाईक असे मृत महिलेचे नाव असून दत्ताराम नागु पिंगळा असे या आरोपीचे नाव आहे. या दोघांचे प्रेमसंबंध होते. परंतु अर्चनाच्या काकांचा त्यांच्या प्रेमाला विरोध होता. त्यांनी चंद्रकांत नाईक यांच्यासोबत अर्चनाचे काही वर्षापूर्वी लग्न लावून दिले होते. त्या रागाच्या भरात दत्तारामने २०१८ मध्ये काकाला संपविले. खून केल्याप्रकरणी तो काही वर्षे कारागृहात होता. कारागृहातून सुटून आल्यावर तो अर्चनाला भेटण्यासाठी सोमवारी (दि.१) रात्री आठ वाजण्याच्या पान २ वर

## भावपूर्ण श्रद्धांजली

### विसावे पुण्यस्मरण



## मधुसूदन काशिनाथ नाईक

मृत्यू : भाद्रपद शुद्ध प्रतिपदा
४ सप्टेंबर २००५ (तिथीप्रमाणे आज)

**प्रशांत नाईक आणि परिवार**

### पुणे-मुंबई मार्गावर चार्जिंग स्थानकांची उभारणी | महामार्गावर करण्यात येणार सर्वेक्षण

# इलेक्ट्रिक वाहनांचा प्रवास सुकर

**। पुणे । प्रतिनिधी ।**

राज्य सरकारच्या इलेक्ट्रिक वाहन (इलेक्ट्रिक व्हेईकल) धोरणानुसार पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर (एक्सप्रेस वे) आठ ईव्ही चार्जिंग स्थानके उभारण्यात येणार आहेत. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) चार्जिंग स्थानक कोठे उभारायचे, याबाबत महामार्गावर सर्वेक्षण करण्यात येणार आहे. त्यामुळे आता या द्रुतगती महामार्गावर इलेक्ट्रिक वाहनांचा प्रवास सुकर होणार आहे.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या वाहन या संकेतस्थळावरील आकडेवारीनुसार, आतापर्यंत ५.५८ लाखांहून अधिक इलेक्ट्रिक वाहने नोंदणीकृत आहेत. त्याचबरोबर पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरून दैनंदिन सरासरी १.४ लाख वाहने ये-जा करतात. वाहतूक कोंडी, अपघात या कारणांमुळे इलेक्ट्रिक वाहने रस्त्यात अडकून पडल्याने इलेक्ट्रिक वाहनांची चार्जिंग क्षमता कमी होते. अचानक वाहने रस्त्यात बंद पडण्याच्या समस्या निर्माण होत असून, वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे एमएसआरडीसीने इलेक्ट्रिक वाहनांसाठी तातडीने चार्जिंग स्थानके आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही सुरू केली आहे.

राज्य सरकारने स्वच्छ, पर्यावरणपूरक वाहतुकीला प्रोत्साहन देणे आणि कार्बन-न्यूट्रल महामार्ग विकसित करण्याच्या दृष्टीने इलेक्ट्रिक वाहन धोरण २३ मे रोजी जाहीर केले आहे. तांत्रिक पान २ वर

> **राज्य सरकारच्या इलेक्ट्रिक वाहन धोरणानुसार पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर एमएसआरडीसीकडून आठ इलेक्ट्रिक चार्जिंग स्थानके उभारण्यात येणार आहेत. त्यानुसार जागांसाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे.**
>
> **-राजेश पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक, एमएसआरडीसी**






# समुद्रकिनारा कचऱ्याच्या विळख्यात

**। रेवदंडा । विशेष प्रतिनिधी ।**

कोकणाला लाभलेला सुमारे ७२० किलोमीटरचा अथांग समुद्रकिनारा आज कचऱ्याच्या विळख्यात सापडला आहे. मुंबईपासून रायगड-रत्नागिरीपर्यंत सर्वच किनारे प्लास्टिक, ऑईल आणि मायक्रोप्लास्टिकने प्रदूषित झालेले आहेत. मुसळधार पावसात वाहणारे नदी-नाले, बेफिकीर नागरिक व प्रशासनाचा निष्काळजीपणा यामुळे टनावारी कचरा थेट समुद्राच्या पोटात जात आहे. कचऱ्यातील प्लास्टिकचे कण आणि ऑइल हे हजारो मासे, कासव व पक्षांच्या शरीरात अडकून त्यांचा श्वास गुदमरून ते मृत्युमुखी पडत आहेत. तसेच, माशांना मायक्रोप्लास्टिक आणि खाद्य यात फरक करता येत नाही. परिणामी सी-फूड दूषित होत असून मानवी आरोग्यालाही थेट धोका निर्माण झाला आहे.



## समुद्रकिनारे बदनामीच्या वाटेवर

रायगड ते रत्नागिरी जिल्ह्यापर्यंत अनेक किनाऱ्यांवर ऑइल मिश्रित प्लास्टिकचा थर पसरलेला दिसतो. किनाऱ्यांवर साचलेल्या ऑइल मिश्रित कचऱ्यामुळे पर्यटन उद्योगालाही फटका बसत आहे. स्वच्छ समुद्रकिनाऱ्यांची ओळख असलेला कोकण आता 'कचऱ्याचा किनारा' म्हणून बदनाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. समुद्राच्या पाण्यात डायक्लोरोडिफेनिल ट्रिक्लोरोइथेन आणि पॉलिक्लोरिनेटेड बायफेनिल्स सारखी अत्यंत घातक रसायने आढळत आहेत.

कोकण समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची रेलचेल दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे. मात्र, पर्यटकांसह स्थानिकांकडून देखील कळत नकळत समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणात कचरा फेकला जातो. स्थानिक प्रशासनाकडून देखील कचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावली जात नाही. किंवा समुद्रकिनारी कचरा होऊ नये, यासाठी देखील उपाययोजना केली जात नाही. काही ठिकाणी कचरा प्रशासनाच्या उपाययोजनांना केराची टोपली दाखवल्याचे निदर्शनास येत आहे. परिणामी समुद्रकिनारी साचलेला कचरा समुद्राच्या भरतीसोबत आंत जातो. त्यामुळे समुद्राचे प्रंचड प्रमाणात प्रदुषण होते. त्यामुळे समुद्रावर अवलंबून असणाऱ्या जीवांसह मानवी आरोग्य देखील धोक्यात येत आहे. तज्ज्ञांच्या मते दरवर्षी जगभरात १०० दशलक्षाहून अधिक समुद्री जीव केवळ प्लास्टिक कचऱ्यामुळे मृत्यमुखी पडतात. तसेच, समुद्राच्या प्रदूषणामुळे माशांचे प्रमाण प्रंचड प्रमाणात घटत चालले आहे.

## 'वर्ल्ड ऑफ नीम' उपक्रमाला प्रतिसाद

**रायगड :** हिमालय वेलनेसने 'वर्ल्ड ऑफ नीम' हा उपक्रम ताज लॅण्ड्स एंड येथे पिंपल एक्ने पॉझिटिव्हिटी डेच्या पूर्वसंध्येला आयोजित केला, ज्यामध्ये त्वचेच्या निगेबद्दल आणि आत्मविश्वासाबद्दल एक महत्त्वपूर्ण संवाद सुरू करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या कार्यक्रमात त्वचेची निगा कशी साधी, प्रभावी आणि सर्वंकष असू शकते, तसेच पिंपल्स व एक्ने भोवती असलेला कलंक कसा दूर केला जाऊ शकतो हे दाखवण्यात आले. राजेश कृष्णमूर्ती यांनी सांगितले कि हिमालय वेलनेसमध्ये त्वचेची निगा कोमल, प्रभावी आणि नैसर्गिक असावी. आमचा नीम फेस वॉश गेली २५ वर्षे दैनंदिन निगेचे प्रतीक आहे. नव्या ५-पार्ट्स ऑफ नीम फॉर्म्युलेशनमुळे आम्ही ही परंपरा अधिक मजबूत करत आहोत.

# संजीवनी ब्लड ग्रुप रजिस्ट्री ॲपचे लोकार्पण

**। रायगड । प्रतिनिधी ।**

वोक्हार्ट फाऊंडेशनच्या संकल्पनेतून विकसित झालेल्या आणि एलआयसी हौसिंग फायनान्स लिमटेडचे सीएसआर अर्थसहाय्य मिळालेल्या 'संजीवनी ब्लड ग्रुप रजिस्ट्री ॲप' या अत्यंत महत्वाच्या अशा ॲपचे लोकार्पण महाराष्ट्राचे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याणमंत्री प्रकाश आबीटकर यांच्या हस्ते आरोग्य भवन येथे झाले.

या ॲपच्या निर्मितीमध्ये आरोग्य विभागाच्या एसबीटीसीचे अर्थात स्टेट ब्लड ट्रान्सफ्युजन कौन्सिलचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे.

या उद्घाटन सोहळ्याला आरोग्य विभागातील डॉ नितीन अंबाडेकर, एलआयसी हौसिंग फायनान्सच्या सीएसआर आणि ईएसजीच्या सह-महाव्यवस्थापक अनिथा पी एस




कुमारी आणि सीएसआर प्रोजेक्ट लीड यश जैन, फेस्कॉम या ज्येष्ठ नागरिक स्वयंसेवी संस्थेचे सुरेश पोटे व इतर प्रतिनिधी तसेच वोक्हार्ट फाऊंडेशनच्या डॉक्टर पल्लवी छनाना आणि उर्वरित प्रकल्प चमू आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

आरोग्य विभाग आणि 'एसबीटीसी'च्या मार्गदर्शनाखाली आपत्कालीन परिस्थितीत इतरत्र रक्तदाते शोधण्याऐवजी ब्लड बँका थेट या ॲपमध्ये नोंदणीकृत असणाऱ्या जास्तीत जास्त रक्तदात्यांपर्यंत एका क्लिकद्वारे पोहचू शकतील. अशा वेळेस रक्तदात्यांना त्यांच्या फोनवर नोटिफिकेशन येईल व उपलब्धतेनुसार रक्तदान करता येईल की ज्यामुळे गरजेच्या वेळी रक्तदान केल्याचं समाधान देखील रक्तदात्याना लाभेल. संजीवनी ब्लड ग्रुप रजिस्ट्री ॲपफ हे रक्तदाते व रक्तपेढ्यांना एका डिजिटल व्यासपीठावर जोडणारं साधन असून या माध्यमातून रक्तसंकलन अधिक वेगवान व सुलभ होईल,असे मत वोक्हार्ट फाऊंडेशनच्या डॉक्टर पल्लवी छनाना यांनी ॲपचे लोकार्पण कार्यक्रमात मांडले.

# महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेचे उद्घाटन

**। रोहा । प्रतिनिधी ।**

भट नर्सिंग होम येथे आज महाराष्ट्र राज्याच्या महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजनेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी भट नर्सिंग होमचे डॉ.रघुनाथ भट, डॉ. अपूर्व भट, डॉ. पूजा भट, मंजिरी भट, माजी नगराध्यक्ष समीर शेडगे, समीर सकपाळ, वरसे



सरपंच राम म्हात्रे, नरेश पाटील, मयुर दिवेकर, महेश कोलटकर, शिल्पा धोत्रे, बिलाल मोर्बे कर उपस्थित होते.

सदर योजनेअंतर्गत पिवळा व केशरी रेशन कार्ड असणाऱ्या लोकांना १३५६ प्रकारचे विविध आजारांवरचे निदान तसेच मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत. सद्या फ्रॅक्चर शस्त्रक्रिया, कॅन्सर शस्त्रक्रिया, मूतखडा शस्त्रक्रिया आणि केमोथेरपी दिली जाणार आहे.

# रोहा येथे मोफत नेत्र, मधुमेह तपासणी शिबीर संपन्न




**। रोहा । प्रतिनिधी ।**

सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट रोहा व लायन्स क्लब रोहा यांचे संयुक्त विद्यमाने दरवर्षीप्रमाणे सामाजिक बांधिलकी जपत यावर्षीही बुधवारी (दि.३) मोफत नेत्र तपासणी, मोफत मधुमेह तपासणी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आलेले होते.

या विविध शिबिरात असंख्य रुग्णांनी सहभाग घेऊन तपासणी केली.भाटे सार्वजनिक वाचनालय रोहा येथे सदर शिबीर संपन्न झाला.

या शिबिरामध्ये महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अश्रू ग्रंथी (लासूर) या नेत्र विकारावर मोफत उपचार व शस्त्रक्रिया तिरळेपणा या नेत्र विकारावर मोफत उपचार व शस्त्रक्रिया,मोफत नेत्र तपासणी

मोफत मधुमेह तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया संदर्भात तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले. हे शिबिर लायन्स हेल्थ फाऊंडेशन अलिबाग यांच्या विशेष सहकार्याने आयोजित करण्यात आलेले आहे.

शिबीर सुरु होण्यापूर्वी लायन्स क्लब अध्यक्ष लक्ष्मण शिट्यालकर, सुश्मिता शिट्यालकर, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ अध्यक्ष अमेय जोशी, लायन्स क्लब सचिव तेजल शाहा, मिलन शाहा, संपदा देशपांडे, वैकुंठ माने, नुरुद्दीन रोहवाला, बिना दामाने, प्रेषित बारटक्के, चंद्रकांत पार्टे, अकील रोहवाला आदी उपस्थित होते.



## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे नांदगाव, ता.कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक शेन जोसेफ मुझेंल्लो यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रू. पै |
|---|---|---|---|
| १३ | ८ | २-४५-०० पैकी लिहुन देणार यांच्या मालकीच्या २-२५-०० इतके विकत दिलेले क्षेत्र | १-७५ |

तरी सदर मिळकतींमध्ये इतर कोणाचा कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यानिशी खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ०७ (सात) दिवसांत नोंदवावी. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ०४/०९/२०२५
मो. ९९२१७२२२००

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**समीर हरिश्चंद्र लाड**
शॉप नं ०२, साई सावली अपार्टमेंट,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, कर्जत, रायगड


## आढळला अनोळखी मृतदेह

**पनवेल :** पनवेल पालिकेच्या पाठीमागे असलेल्या मैदानात अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला असून त्याचे वय ४५ वर्षे, डोक्यावर केस काळे व पांढरे, तोंड अर्धवट उघडे डोळे अर्धवट उघडे, दाढी पांढरी वाढलेली दिसत आहेत.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Estimated cost |
|---|---|---|
| Tend-5/25-26 7000037416 | Procurement of 33kV PT & 22kV PT required at various substation under EHV (O&M) Circle. **Tender Fee Rs. 500/- +GST** | Rs. 540724/- |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 02.09.2025 to 18.09.2025 up to 11:00 hrs, Opening date:- 18.09.2025 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer(Adm)
Tel No. 022-27459625, Mob. No. 8412050202
E-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


# पान १ वरून

## जिद्दीने कामाला लागा

याप्रसंगी मार्गदर्शन करताना जयंत पाटील म्हणाले की, शेतकरी कामगार पक्षाची मते आजही कायम आहेत. जिल्ह्यात साडेचार लाख मते आहेत. हे निवडणुकांमध्ये दाखवून दिले आहे. आगामी काळात वेगळा पॅटर्न घेऊन काम करण्याचा मानस आहे. ग्रुप व बुथ स्तरावर मतदारापर्यंत पोहचणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या आघाड्यांच्या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. साडेचार हजारहून अधिक पदे निवडली आहेत. पक्षाने प्रत्येकाला चांगले काम करण्याची संधी दिली आहे. पक्षाचे महत्व तळागाळापर्यंत पोहचविण्याचे काम प्रत्येकाने करणे गरजेचे आहे. शेतकरी कामगार पक्षाचा दर्जा कायम ठेवण्यासाठी त्यापध्दतीने काम करायचे आहे. पुढे निवडणुका होणार आहेत. घर स्तरावर जाऊन प्रत्येक कार्यकर्त्यांनी काम केल्यास ही निवडणूक आपल्या सर्वांसाठी सोपी ठरणार आहे. विरोधकांना धडकी भरेल, अशा पध्दतीने महिला आघाडीसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जबाबदारीने काम करावे, असे आवाहन जयंत पाटील यांनी केले.

## शेकापतर्फे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

पाडण्यात त्यांचा एक वेगळा हातखंडा होता. उत्तम वक्त्या तसेच संसदपटटू म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांच्या कार्याचे स्मरण राहवे, यासाठी शेकापच्या वतीने त्यांच्या जयंतीनिमित्त जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. शेतकरी कामगार पक्ष पुरोगामी विद्यार्थी संघटना अलिबाग, पुरोगामी युवक संघटना अलिबाग, शेकाप सांस्कृतिक सेल अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने मा. राज्यमंत्री स्व. मीनाक्षीताई वकृत्व करंडक २०२५ वक्तृत्व स्पर्धा १३ सप्टेंबरला होणार आहे.

या स्पर्धेत स्थानिक प्रश्नांचे राज्यस्तरिय नेतृत्व मीनाक्षीताई पाटील, येवा कोकण आपलोच असा-पण विकासाचं काय?, सावित्रीच्या लेकी चालल्या पुढे, संघर्षातून आत्मनिर्भरतेकडे, नफरत के बाजार मे मोहोब्बत बेच रहा हू मै, सकारात्मक बदलाची सुरुवात-व्यक्तीच्या प्रयत्नातून समाजापर्यंत, रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग या विषयांवर वकृत्व स्पर्धा होणार आहे. स्पर्धेतील प्रथम क्रमांकाला रोख रक्कम ११ हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला रोख रक्कम ८ हजार रुपये व चषक, तृतीय क्रमांकाला रोख रक्कम ५ हजार रुपये व चषक, चतुर्थ क्रमांकाला रोख रक्कम ३ हजार रुपये व चषक तसेच पाचव्या क्रमांकाला रोख रक्कम २ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच प्रत्येकी १ हजार रुपये व चषक अशी पाच उत्तेजनार्थ बक्षीसे दिली जाणार आहेत. अधिक माहितीसाठी वेदांत कंटक (८३२९७७५५३१), हर्ष ढवळे (९७३०८१७२२७) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दिवीवाडीतील महिलेची हत्या

सुमारास आदिवासीवाडीमधील तिच्या घरी गेला. त्यावेळी दोघांचे शाब्दिक वाद झाले. हा वाद विकोपाला पोहचला. त्याने रागाच्या भरात तिचा दोरीने गळा दाबून तिला ठार केली. त्यानंतर तो तेथून पसार झाला. ही घटना सोमवार ते मंगळवारच्या दरम्यान घडली. या घटनेची माहिती रेवदंडा पोलिसांना मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन मारेकऱ्याचा शोध सुरू केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत किरवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकासह श्वान पथकाने तपासाची सूत्रे वेगाने हलविली. अखेर आदिवासीवाडीपासून काही अंतरावर असलेल्या जंगल भागात लपून बसलेल्या दत्ताराम पिंगळा याला पोलिसांनी अवघ्या तीन तासात अटक केली व त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## ओबीसी नेते आक्रमक

होत असून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या महत्वाच्या नेत्यांची देवगिरी या सरकारी निवासस्थानी बैठक होत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल बैठकीला उपस्थित राहणार आहेत. तर, महायुतीत मंत्री भुजबळ यांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर संभाव्य अडचणी लक्षात घेत बैठक होतं असल्याची सूत्रांची माहिती आहे. दरम्यान, मंत्री भुजबळ यांनी पक्षाच्या प्री कॅबिनेट बैठकीत ओबीसी आरक्षणप्रश्नी होतं असलेल्या अन्यायाबाबत उघड भूमिका घेतल्यानंतर वरिष्ठ नेत्यांच्या पार पडणाऱ्या बैठकीला विशेष महत्व आहे.

## अकरावी प्रवेश प्रक्रिया लांबणीवर

विद्यार्थ्यांना नोंदणी करण्यासाठी किंवा भाग-१ मध्ये दुरुस्ती करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर ४ सप्टेंबरला प्रवेश क्षमता वाढवली जाणार असून ५ सप्टेंबरला रिक्त जागा प्रदर्शित केल्या जाणार आहेत. ६ ते ७ सप्टेंबर या कालावधीत विद्यार्थी प्रवेश अर्जाचा भाग २ म्हणजेच पसंतीक्रम भरू शकतील. ८ सप्टेंबर रोजी निवड यादी जाहीर होणार असून ८ व ९ सप्टेंबर या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रवेश घ्यायचे आहेत.

## इलेक्ट्रिक वाहनांचा प्रवास सुकर

व्यवहार्यतेनुसार राज्य व राष्ट्रीय महामार्गावर प्रत्येकी २५ किलोमीटर अंतराने इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा उभारणी करण्याबाबत धोरणात नमूद केले आहे. पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावर चारचाकी इलेक्ट्रिक खासगी वाहनांसाठी ५० ते २५० किलोवॉट ऊर्जा श्रेणीनुसार १५ टक्क्यांपर्यंत सवलत देण्यात येणार आहे. परिवहन विभाग, तेल व विपणन कंपन्यांमध्ये सामंजस्य करार करण्याबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार पुणे-मुंबई द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू या ठिकाणी इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे प्रस्तावित आहे.

## विसर्जनासाठी गेलेल्या भक्ताचा मृत्यू

असताना त्याला दम लागल्याने तो पाण्यात बुडाला आहे. त्याचा तलावात शोध घेण्यात आला. परंतु तो मिळाला नाही. अखेर रोहा येथील रेस्क्यू टीमच्या मदतीने शोध घेण्यात आला. अखेर बुधवारी सायंकाळी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह तलावात मिळून आला.

## ग्राहकांची हॉटेल मालकास मारहाण

जेवण मिळण्यास थोडा उशीर होईल, असे सांगितले. यामुळे तीनही तरुणांना राग आला आणि आणि नागेश शिंदे याने फिर्यादी हॉटेल मालक मनोज शिबुगडे यांच्या कानाखाली आणि सचिन गोळे याने हॉटेल मालकाचा मुलगा शुभम शिबुगडे याला डोक्यात व हातावर प्लेट मारून दुखापत केली. तसेच तिसरा तरुण महेश शिंदे याने हॉटेल मालकाची मुलगी ऋतुजा हिच्या पोटात लाथ मारली. तिन्ही तरुणांनी हॉटेल मालक व त्याच्या मुला-मुलीला धक्काबुक्की केली. रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास झालेल्या या राड्याचा गुन्हा बुधवारी पहाटे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास पोलादपूर पोलीस स्टेशनमध्ये सहाय्यक फौजदार सरोदे यांनी दाखल केला. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांनी हॉटेल मनस्वाद येथे तातडीने पोलीस कर्मचाऱ्यांसमवेत जाऊन पुढील कायदेशीर कारवाई केली. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार सतीश कदम हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.

## वृद्ध महिलेची हत्या करून केली चोरी !

१०.३० वाजण्याच्या दरम्यान मौजे कुंभे पुनर्वसन वसाहत भादाव येथे शांताबाई शंकर कांबळे यांच्या घरात कोणीतरी अज्ञात व्यक्तीने ती वृद्ध महिला एकट्याच असताना अज्ञात आरोपीने त्यांचे घरामध्ये प्रवेश करून कोणत्यातरी हत्याराने त्यांना ठार मारून त्यांचे अंगावरील ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे चैन १० ग्राम वजनाची तसेच ५० हजार रुपये किमतीचे हातातील सोन्याच्या १ जोड बांगड्या १० ग्राम वजनाच्या असा एकून १ लाख किमतीची हत्या करून जबरी चोरी केली. या घटनेची फिर्याद रामचंद्र बावदाने यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली या प्रकरणी माणगाव पोलिसांनी अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत. या घटनेची माहिती मिळताच रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांनी भेट देवून तपास सुरु केला आहे.

## नेरळमध्ये चोरी

तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी तत्काळ चार शोधपथके तयार केली आहेत. तसेच सीसीटीव्ही कॅमेऱ्यातील फुटेजच्या आधारे तपास सुरू करण्यात आला आहे.घटनास्थळी कर्जत उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल गायकवाड व नेरळ पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी शिवाजी ढवळे यांनी पाहणी केली.

## आज पंतप्रधान नरेंद्र मोदी जेएनपीएत

जेएनपीएच्या बीएमसीटीच्या गेट नं.१६ जवळ हा कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय बंदर आणि जलवाहतूक मंत्री सर्वानंद सोनोवाल, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री शांतनु ठाकूर, खासदार श्रीरंग बारणे उपस्थित असणार आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नवी मुंबईत येणार असल्याने प्रशासनाने तयारी सुरु केली आहे. नवी मुंबईत पोलिसांकडूनही सर्वत्र तपासणी केली जात आहे. तर भाजपच्या पदाधिकाऱ्यांनीही मोदी यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी सुरु केली आहे.

मोदी हे या कार्यक्रमात काय वक्तव्य करणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जेएनपीए बंदरातील एका कार्यक्रमासाठी गुरुवारी उपस्थित राहणार असले तरी नवीमुंबई येथील लोकनेते दि.बा.पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नामकरणाचा रेंगाळत पडलेला प्रश्न सोडविण्यासाठी अशा स्वरूपाची केंद्र सरकारच्या माध्यमातून घोषणा करतात याकडे प्रकल्पग्रस्तांच्या नजरा लागून राहिल्या आहेत.



## माणगांव नगरपंचायत, माणगांव

ता. माणगांव, जि. रायगड, पिनकोड ४०२१०४ Email- nagarapanchayatmangaon@gmail.com. दु.क्र. ०२१४०२६३०५६

जा.क्र./मानपं/जा.नि./१००४/२०२५ -२०२६ दिनांक ०३/०९/२०२५

### जाहीर फेरनिविदा/निविदा सुचना

निम्ननिर्देशित कामाकरीता इच्छुक ठेकेदारांकडून दोन लखोटा पद्धतीने सिलबंद निविदा खाली नमुद कालावधी पर्यंत मागविण्यात आले आहेत. कोरी निविदा मागणी अर्ज खाली नमुद कालावधीपर्यंत लेखी स्वरूपात माणगांव नगरपंचायत कार्यालयात कोरी निविदा पत्राची फी (ना परतावा) भरून मिळू शकतील.

| अ क्र | कामाचे नांव | कालावधी | कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | माझी वसुंधरा अभियान अंतर्गत माणगांव नगरपंचायत करिता कापडी पिशवी छपाई करणे. (फेर निविदा क्र.३) | दि.०४/०९/२०२५ ते दि. ११/०९/२०२५ | -- | ५,०००/- | ५००/- |
| २ | माणगांव नगर पंचायतीला विविध कामासाठी जेसीबी, क्रेन,पोकलेन, ट्रक,डंपर, ट्रॅक्टर इत्यादी वाहन व यंत्रसामुग्री पुरवठा करणे. (फेर निविदा क्र. ३) | दि.०४/०९/२०२५ ते दि.११/०९/२०२५ | -- | १०,०००/- | १,०००/- |
| ३ | माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये ग्रीट पुरवठा करणे व पसरवून देणे. (फेर निविदा क्र. ३) | दि. ०४/०९/२०२५ ते दि.११/०९/२०२५ | -- | १०,०००/- | १,०००/- |
| ४ | माणगांव नगर पंचायतीच्या पाणीपुरवठा विभागातील पाणीपुरवठा करणाऱ्या वाहिन्या वरिल स्लुस वॉल मधील चेक नट व स्पिंडल दुरूस्ती करणे/नविन तयार करणे (फेर निविदा क्र.३) | दि. ०४/०९/२०२५ ते दि.११/०९/२०२५ | -- | २,०००/- | ५००/- |
| ५ | नगरपंचायतीस छापील स्टेशनरी साहित्याचा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे (फेर निविदा क्र.१) | दि. ०४/०९/२०२५ ते दि.११/०९/२०२५ | -- | ५,०००/- | ५००/- |
| ६ | नगर पंचायतीस आवश्यकतेनुसार बॅनर्स व फ्लेक्स पुरवठा करणे (फेर निविदा क्र. १) | दि. ०४/०९/२०२५ ते दि.११/०९/२०२५ | -- | ५,०००/- | ५००/- |
| ७ | माणगांव नगर पंचायतीस न्यायालयीन कामाकरीता कायदेशीर सल्लागार नेमणे (फेर निविदा क्र.१) | दि. ०४/०९/२०२५ ते दि.११/०९/२०२५ | -- | २,०००/- | ५००/- |
| ८ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील रस्त्यावरील खड्डे बुजविणे. | दि. ०४/०९/२०२५ ते दि.११/०९/२०२५ | -- | ५,०००/- | ५००/- |
| ९ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील बामणोली रोड कॉर्नर येथील गटार बांधकाम करणे. | दि. ०४/०९/२०२५ ते दि.११/०९/२०२५ | ६,५७,८६२/- | ६,५७९/- | १,०००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

वरील कामांच्या निविदा बाबतची अटी, शर्ती व निविदा फॉर्म माणगांव नगरपंचायत कार्यालयामध्ये उपलब्ध आहेत.

**जाहीर ई - निविदा सुचना**

मुख्याधिकारी, माणगांव नगरपंचायत, हे निम्ननिर्देशित खालील कामांकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत, अनुभवी व इच्छुक ठेकेदारांकडून ई. निविदा पद्धतीने निविदा मागविर्णेत येत आहे.

| अ क्र | कामाचे नांव | कालावधी | कामाची रक्कम | इसारा रक्कम | निविदा फार्म फी |
|---|---|---|---|---|---|
| १ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र.७ मधील आदर्श समता नगर येथील साई मंदिर परिसर सुशोभीकरण करणे. | दि. ०४/०९/२०२५ ते दि. ११/०९/२०२५ | ९,८५,१६६/- | ९.८५२/- | १,०००/- |
| २ | माणगांव नगरपंचायत हद्दीतील प्रभाग क्र. १७ मधील शंकर मंदिर परिसर पेव्हर ब्लॉक बसविणे व सुशोभीकरण करणे. | दि. ०४/०९/२०२५ ते दि. ११/०९/२०२५ | ७,७८,४३७/- | ७,७८८/- | १,०००/- |
| ३ | माणगांव नगरपंचायत हद्दीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणे कामी प्रकल्प सल्लागार यांची नेमणूक करणे | दि.०४/०९/२०२५ ते दि. ११/०९/२०२५ | -- | ५,०००/- | ५००/- |

**कामाच्या अटी व शर्ती**

वरील संपूर्ण प्रक्रिया ई-निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर ई-निविदा सुचना प्रसिद्धी आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धीपत्र इत्यादी माहिती https://www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**माणगांव नगरपंचायत**

# निवडक

## करंजाडेतून मोटारसायकलची चोरी

**पनवेल :** करंजाडे येथे एका व्यक्तीने आपली दुचाकी उभी करून ठेवली होती. ती दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. ओम नरेंद्र सिंग असे दुचाकी मालकाचे नाव आहे. त्यांनी त्यांची १५ हजार रुपये किमतीची निळ्या रंगाची बजाज सिटी (एमएच-४६-एएस-२७४८) ही करंजाडे सेक्टर १ येथे उभी करून कामानिमित्त निघून गेले. ते पुन्हा त्या ठिकाणी आले असता दुचाकी चोरीला गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. याबाबत ओम सिंग यांनी अज्ञात चोरट्याने त्यांची गाडी चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात केली आली आहे.

## एसटीच्या धडकेने पादचारी जखमी

**पनवेल :** पळस्पे फाटा ते पनवेल जाणाऱ्या रस्त्यावरील न्यू पंजाब हॉटेल समोर एसटी बसची दोन पादचाऱ्यांना धडक बसून अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोघे पादचारी जखमी झाले आहे. एसटी बस (एमएच-१४-बीएच-३०२६) चालक वैभव पेटकर हे आपल्या ताब्यातील बस घेऊन पळस्पे फाट्यावरून पनवेलच्या दिशेने जात होते. न्यू पंजाब हॉटेल जवळ एसटी बस आली असता त्या बसची धडक रस्त्यावरून चालणाऱ्या दोन पादचाऱ्यांना बसली. सुहान शेख (१७) व कैफ खत्री असे अपघातग्रस्त पादचाऱ्यांचे नाव असून दोघेही जखमी झाले आहेत. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.




## तळोजा कारागृहातील वाचनालयाला पुस्तकांची भेट

**पनवेल :** इनरव्हील क्लब पनवेलच्या सदस्यांनी तळोजा मध्यवर्ती कारागृहाला भेट देत तेथील वाचलायनासाठी पुस्तके भेट दिली आहेत. तसेच, पोलीस व कैदी बांधवांना राखी देखील बांधली. या उपक्रमातून बंधुत्व आणि प्रेमाचा संदेश देत कैद्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यावेळी कैद्यांना प्रबोधनात्मक माहिती देण्यात आली व त्यांच्या वाचनालयासाठी पुस्तके दान करण्यात आली. तळोजा कारागृहातील सर्व पदाधिकाऱ्यांनी हा कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडावा यासाठी सहकार्य केले.

## पुरेश्या एसटी गाड्यांचे नियोजन

**रोहा :** कोकणात गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येत असल्यामुळे मुंबईसह इतर जिल्ह्यांतून चाकरमानी रायगड जिल्ह्यात आले होते. सात दिवसांचा गणेशोत्सव उत्साहात साजरा करून मंगळवारी (दि.२) गौरी-गणपतींचे विसर्जन केल्यानंतर कोकणवासिय मुंबईला परतीच्या प्रवासासाठी निघाले आहेत. त्यामुळे बुधवारी (दि.३) रोहा आगारातून ४५ गाड्या ग्रुप बुकिंगसाठी तर २७ गाड्या आरक्षित तिकिट धारकांसाठी उपलब्ध करण्यात आल्या होत्या. तसेच, पनवेलपर्यंत जाण्यासाठी २० गाड्या राखीव ठेवण्यात आल्या होत्या. याशिवाय ग्रामीण भागातून रोह्यात येण्यासाठी पुरेशा गाड्यांचे नियोजनही केले असल्याची माहिती रोहा आगार प्रमुख प्रकाश शेलार यांनी दिली. ज्यांना आपल्या गावापासून एसटी बस उपलब्ध व्हावी त्यांच्यासाठी ग्रुप बुकिंग सेवा दिली आहे. यासोबत रोहा, तळा, कोलाड, इंदापूर व नागोठणे बस स्थानकावरून आरक्षण सुविधेसह प्रवास करता यावा यासाठी गाड्या सोडण्यात आल्या आहेत. तसेच, रोहा बस आगारातून पनवेलपर्यंत विना वाहक एसटी बस दर अर्ध्या तासाने सोडण्यात येत आहेत.

# जिल्ह्यात आजही शेकापची ताकद अबाधित

■ माजी आ. बाळाराम पाटील यांचे मत








रायगड जिल्हा परिषदेसह पनवेल महानगरपालिकेचा प्रारुप आराखडा जाहीर झाला आहे. आपल्याला ताठ मानेने उभे राहण्यासाठी या निवडणुका जिंकाव्या लागणार आहेत. त्यानुसार कार्यकर्त्यांनी तयारी करायची आहे. जिल्ह्यामध्ये शेकापची ताकद आजही अबाधित आहे. सध्या असलेल्या प्रशासकीय राजवटीचे विसर्जन करण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन शेकाप नेते माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, जिल्ह्यामध्ये बाहेरून येणाऱ्यांचा ओघ वाढत आहे. तिसऱ्या मुंबईच्या माध्यमातून रोह्यापर्यंत जिल्हा स्थिरावणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील १५ तालुक्यांनत बुथस्तरावर निटनेटके काम करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात मत चोरीचा प्रश्न गंभीर आहे. त्याचे षडयंत्र पोलादपूरपासून कर्जत, पालीमध्ये होऊ शकते. यावर अंकुश ठेवण्यासाठी मतदार याद्या तपासून घेणे आवश्यक आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका होणार आहेत. निवडणूक प्रक्रीया सुरु होण्यापुर्वी मतदार याद्या दुरुस्त करण्याचे काम करायचे आहेत. तरच सत्याच्या मार्गाने निवडणूक येण्याची अपेक्षा आहे, असे बाळाराम पाटील यांनी सांगितले.

## जबाबदारीने काम करा

■ जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांचे प्रतिपादन



जिल्ह्यात चिटणीस मंडळासह वेगवेगळ्या आघाड्यांच्या पदाधिकारी सभासदांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. पक्षाने कार्यकर्त्यांनी चांगली संधी दिली आहे. त्यापद्धतीने प्रत्येकाने काम केले पाहिजे. पक्षाची ध्येय-धोरणे तळागाळापर्यंत पोहचविण्याचे काम केले पाहिजे. महिलांसह विद्यार्थी, कामगार, शेतकरी, युवकांच्या प्रश्नांची सोडवणूक आघाडीच्या माध्यमातून केल्यास स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणूका सोप्या जातील. मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या रायगड जिल्हा परिषदेवर शेतकरी कामगार पक्षाचे वर्चस्व राहिले आहे. ते कायम राहवे, यासाठी काम करणे गरजेचे आहे . जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रभाग रचनेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेवर वर्चस्व निर्माण करण्यासाठी पनवेल, अलिबाग, कर्जत, पेण, महाड, खालापूर, उरण, रोहा व माणगाव या तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांवर मोठी जबाबदारी आहे. बुथ अध्यक्षाची नेमणूक करून त्यापद्धतीने काम करण्याचा मानस आहे, असे मत शेकाप जिल्हा चिटणीस सुरेश खैरे यांनी व्यक्त केले.



# एलिफंटा बेटावर मास्टर प्लॅनिंग

■ नफा कमाविण्यासाठी सिडकोची उरणच्या बेटांवर वक्रदृष्टी?

| चिरनेर | दत्तात्रेय म्हात्रे |

गोरगरिबांच्या कवडीमोल भावाने संपादन केलेल्या जमिनी बड्या भांडवलदारांना विकून कोट्यवधींचा नफा कमाविणाऱ्या सिडकोची वक्रदृष्टी आता जागतिक किर्तीच्या एलिफंटा बेटावर वळली आहे. एलिफंटा व न्हावा बेटावर पर्यटनासाठी मास्टर प्लॅनिंग आणि आर्थिक मॉडेलिंगसाठी सल्लागार सेवा नियुक्ती करण्यासाठी सिडकोने निविदा मागविल्या आहेत. त्यामुळे सर्वच ठिकाणी घोळ घालणाऱ्या सिडकोच्या या निर्णयामुळे स्थानिक ग्रामस्थ व परिसरातील व्यावसायिकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

एलिफंटा बेटाला जागतिक वारसा लाभलेला आहे. अशा या वर्ल्ड हेरिटेजचा दर्जा असलेल्या एलिफंटा बेटाचा आणि पर्यटकांच्या विकासासाठी पुरातत्व पुरातन विभाग, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, आयटीडीसी, बंदर विभाग, एनजीओ, स्थानिक ग्रामपंचायत आणि इतर विविध शासकीय विभागाच्या माध्यमातून सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे थोड्याफार प्रमाणात एलिफंटा बेटाचा विकास आणि पर्यटकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, गैरसोयी दूर करण्यात यश आले आहे. एलिफंटा बेट ४ किमी चौरस किलोमीटर क्षेत्रात विसावले आहेत. यामध्ये सर्वाधिक जमिनीचे क्षेत्र वन विभागाच्या अखत्यारित येत आहे. तर पुरातत्व, नौदल, बंदर विभाग आणि स्थानिक शेतकऱ्यांच्या मालकीचेही काही क्षेत्र आहे. मात्र, आता जागतिक किर्तीच्या एलिफंटा बेटावर सिडकोने वक्रदृष्टी वळविली आहे.

वूई मेक सिटीजचा दावा करणाऱ्या सिडकोने याआधीच नवी मुंबई परिसरात दुसऱ्या मुंबईची निर्मिती केली. त्यासाठी सिडकोने येथील शेतकरी, प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी कवडीमोल भावाने संपादन केल्या. तसेच, शेतकरी, प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी संपादन करताना वारेमाप आश्वासने दिली होती. मात्र, दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यात सिडको सपशेल अपयशी ठरली आहे. आता सिडकोची वक्रदृष्टी लिफंटा बेटाकडे वळल्याने अशीच स्थिती स्थानिक रहिवाशांवर येण्याची भीती ग्रामस्थ व व्यावसायिकांकडून व्यक्त केली जात आहे.

सल्लागार एजन्सीच्या सल्ल्यानुसारच एलिफंटा व न्हावा बेटावर विकास कामांची दिशा ठरवली जाईल, अशी माहिती सिडकोचे असो. प्लॅनिंग विभागाचे अधिकारी प्रियदर्शन वाघमारे यांनी दिली आहे.

## त्रिकुटाकडून ज्वेलर्सची फसवणूक

**पनवेल:** शहरातील एका सराफाच्या दुकानात ग्राहक बनून आलेल्या त्रिकुटाने खरेदी करण्याच्या बहाण्याने सोने चोरल्याची घटना घडली आहे. याबाबत सराफाला उशिरा माहिती पडल्याने त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार नोंदवली आहे. पनवेलमधील ठाणा नाका येथे एका सराफाचे दुकान आहे. या दुकानामध्ये दोन महिला व एक पुरुष दागिने खरेदी करण्यासाठी आले होते. दुकानातील कर्मचाऱ्यांचे इतर ठिकाणी लक्ष असल्याचे पाहून त्यांनी सोन्याचे कानातले आणि लॉकट चोरले होते. गेल्या काही दिवसांत दुकानातील सामानाची तपासणी केल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्याबाबत सराफाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून या प्रकरणातील त्रिकुटाचा शोध पोलीस घेत आहेत.

# पेज नदीत सापडला मृतदेह

| कर्जत | प्रतिनिधी |




कर्जत-कशेळे रस्त्यावरील धारप फार्म येथील पेज नदीमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. याबाबतची माहिती कर्जत पोलीस ठाण्यातून रक्षा सामाजिक विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांना देण्यात आली. त्यांच्या मदतीने संबंधित मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात यश मिळाले.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच अमित गुरव यांनी निवासी नायब तहसीलदार सचिन राऊत यांच्याशी संपर्क साधून, तहसीलदार ऑफिसमधून जीवरक्षक साहित्य घेतले. त्यानंतर कर्जतचे रिकव्हरी व रेस्क्यू टीमचे सदस्य अक्षय गुप्ता, व्यंकटेश ठाकरे, पोसरीचे संकेत कडू व मांडवणेचे ऋषिकेश कोळंबे हे देखील घटनास्थळी दाखल झाले. पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे मृत व्यक्तीचे शव नदीतून बाहेर काढत असताना लवकर अंधार झाला. यावेळी रक्षा कार्यकर्त्यांनी लाइफ जॅकेट व दोराचा आधार घेऊन, टॉर्चच्या उजेडात पेज नदीतील मृतदेह बाहेर काढला आणि कर्जत पोलीस स्टेशनचे राजेंद्र दुसाने यांच्याकडे तो मृतदेह सुपूर्त करण्यात आला. उद्याप मृतदेहाची ओळख पटलेली नाही. पोलीस निरीक्षक संदीप भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक किरण नवले पुढील तपास करीत आहे.

यावेळी कर्जतचे निवासी तहसीलदार सचिन राऊत, कर्जत पोलीस ठाण्याचे राजेंद्र दुसाने, संतोष साळुंखे, अविनाश पोळ, गिरी, रक्षा मंडळाचे अक्षय गुप्ता, संकेत कडू, ऋषिकेश कोळंबे व्यंकटेश ठाकरे व सुमित गुरव यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# डीपी वर्ल्ड मल्टीमॉडल कस्टम परवाना रद्द

## कमिशनर बी. सुमिदा देवी यांनी केली नोटीस प्रसिद्ध

| उरण | प्रतिनिधी |

उरणमध्ये मोठ्या प्रमाणात गोदामे, विविध प्रकल्प कार्यरत आहेत. मात्र, अनेक प्रकल्प, कंपनीमधून विविध अटी-शर्तीचे उल्लंघन होताना दिसून येत आहे. खोपटे गावातील मेसर्स कॉन्टिनेंटल वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन (न्हावा शेवा) जी सध्या मेसर्स डीपी वर्ल्ड मल्टीमॉडल लॉजिस्टिक्स म्हणून ओळखली जाते, या गोदाम कंपनीचा कस्टम परवाना रद्द झाला आहे. कस्टमने घातलेल्या अनेक अटी व शर्तीचा भंग केला जात असल्याची शिक्षा म्हणून या कंपनीचा कस्टम परवानाच निलंबित करण्यात आला आहे.

डीपी वर्ल्डचा कस्टम परवाना निलंबित करताना कस्टमने २००९ चा नियम ११ (२) च्या तरतुदींनुसार ही कारवाई केली असल्याची बाब जाहीर सूचनेमध्ये अधोरेखित करण्यात आली आहे. त्यामुळे कस्टमने काढलेल्या या नोटीशीच्या अनुशंगाने जोपर्यंत कस्टमचे पुढील आदेश येत नाहीत, तोपर्यंत डीपी वर्ल्डचे कॉंटिनेंटल गोदामातून पुढच्या काळात आयात-निर्यातीचे कोणतेही व्यवहार करू शकत नाही. तसे केल्यास ते कस्टमच्या कायद्याचा उल्लंघन या सदरात मोडण्याची शक्यता आहे. जेएनपी कस्टम हाऊसच्या कमिशनर बी. सुमिदा देवी यांच्या सहीने निर्गमित केलेल्या या नोटीसीद्वारे कॉंटीनेंटल उर्फ डीपी वर्ल्ड गोदामाचा कस्टम परवाना निलंबित करण्यात आला आहे. या नोटीसीचे उल्लंघन केल्यास त्यातून थेट मालकांवर देखील कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आता डीपी वर्ल्डचे व्यवस्थापन नेमकी कोणती भुमिका घेतात? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. या सर्व प्रकाराबाबत कॉंटीनेंटलचे जावेद यांच्याशी सातत्याने संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन उचलले नाहीत.

## राज्य उत्पादन शुल्काची कारवाई

| ठाणे | प्रतिनिधी |

ठाण्याच्या राज्य उत्पादन शुल्क विभागाने गोवानिर्मित विदेशी मद्य बुधवारी (दि.३) जप्त केले. ठाणे खारेगाव दरम्यान जप्त केलेल्या मद्याची किंमत १ कोटी ३६ लाख असून मोहम्मद समशाद सलमानी नामक वाहन चालकाला अटक केली आहे. जप्त केलेले बनावट मद्य १४०० पेट्यांमधून ठाणे, मुंबई विविध वाईन शॉपमध्ये विक्रीसाठी पाठवले जाणार होते. या गुन्ह्यामागे मोठी आंतरराष्ट्रीय टोळी असण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

कोकणकरांचा प्रवास अधिक सुखकर | मुंबई ते रत्नागिरी, सिंधुदुर्ग जलवाहतूक सेवा सुरू

# अखेर 'रो-रो' कोकणात दाखल

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

कोकण रेल्वे पाठोपाठ जलवाहतूक मार्गे राज्य शासनाची बहुचर्चित रो-रो सेवा सुरू करण्यात आली आहे. प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात आलेल्या या जलवाहतूक सेवेचा शुभारंभ बुधवारी (दि.३) करण्यात आला असून पहिली रो-रो सेवा देणारी बोट रत्नागिरी तालुक्यातील जयगड बंदरात दाखल झाली.




मुंबईवासी कोकणकरांचा प्रवास सुखकर होण्यासाठी केंद्रीय शिपींग मंत्रालय आणि राज्य शासनाच्या बंदर विभागाने रो-रो जलवाहतूक सेवेस अंतिम मंजूरी दिली. कोकणात गणेशोत्सव आणि होळी यासारख्या सणांसाठी दरवर्षी कोकणकर कोकणात येत असतात. अशा कोकणकरांचा प्रवास अधिक सुखकर व चांगला होण्यासाठी राज्य शासनाने मुंबई ते जयगड आणि मुंबई ते विजयदुर्ग अशी रो-रो सेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार जलद गतीने पहिली रो-रो सेवा देणारी बोट बुधवारी दुपारी ३ वाजता रत्नागिरीच्या जयगड बंदरात दाखल झाली. राज्य शासनाच्या मत्स्य व बंदर विभागाने या रो-रो सेवेसाठी अत्यावश्यक असणाऱ्या एकूण १४७ परवानग्या मिळविल्यानंतर ही सेवा सुरु करण्यात आली आहे.

मुंबईतील भाऊचा धक्का ते रत्नागिरी-जयगड असा तीन तासांचा तर भाऊचा धक्का सिंधुदुर्ग-विजयदुर्ग असा पाच तासांचा प्रवास रो-रो ने पार पडणार आहे. २५ नॉट्स स्पीडची ही एम टू एम नावाची रो-रो बोट जयगड बंदरात दाखल होताच ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली होती. या रो-रो बोटमध्ये ५५२ इकोनॉमी, ४४ प्रिमीयम इकोनॉमी, ४८ बिझनेस व १२ फस्ट क्लास असे वर्ग करण्यात आले आहेत. या बोटी मध्ये ५० चारचाकी व ३० दुचाकी वाहून नेण्याची क्षमता आहे.

कृषीवल
गणेश दर्शन स्पर्धा २०२५



जिंका रोज आकर्षक बक्षिस

: प्रायोजक :
नागरी सहकारी पतसंस्था (मर्यादित) अलिबाग
आरडीसीसी बँक सहप्रवास प्रगतीचा ISO 9001 - 2015 BANK

प्रवेश मूल्य २०० रु.
(फोटो काढण्याचे मूल्य वेगळे आकारले जाईल.)

आपल्या गणपतीच्या सजावटीसह फोटो पाठवा व बक्षिसे जिंका.

फोटोसाठी स्थानिक संपर्क

| | |
|---|---|
| सुरेश खडपे (चौल) | ९९२१०५४६०६ |
| जीवन पाटील(भाकरवड) | ७०६६८९८६३७/८१४९६६३८१३ |
| संजय गायकवाड (कर्जत) | ९४२३३७७९०० |
| समीर मालोदे (अलिबाग) | ९४२३३७५३६१ |
| मुकुंद रांजणे (माथेरान) | ७५०७६७३८७९ |
| अनिल गवळे (वेणगाव) | ९६८९९५४४२४ |
| नंदकुमार मरवडे (खांब) | ८३०८६८८२२९ |
| सलीम शेख (माणगाव) | ९४२३३८२७८९ |
| सुधीर नाझरे (मुरुड) | ९४२३३७७२४२ |
| समीर रिसबुड (श्रीवर्धन) | ९८८१९२२८३५ |
| दत्ता म्हात्रे (चिरनेर) | ७२०८३७७१०५ |
| जुनेद तांबोळी (महाड) | ८४११९२४४६२ |
| शैलेश पालकर (पोलादपूर) | ९२२६८४९१८५ |
| कांता हाबळे (नेरळ) | ९२०९२३८७६९ |
| राजू नेवासेकर (मुरुड) | ९९२१६२३८४८/८२३७१३८९७४ |
| मुस्कान खान (पेण) | ८९२८९११३९१ |
| राकेश खराडे (रसायनी) | ९६६५३१४११५ |
| बी.एस. कुलकर्णी(मोहपाडा) | ९८६०६०९६५४ |
| भूषण सुतार (सुधागड) | ८१४९६६४०५८ |
| सत्यप्रसाद आढाव (रोहा) | ८९८३४२०१६१ |
| अब्दुल सोगावकर (सोगाव) | ९९६०४८११३३ |
| गणेश चोढणेकर (मुरुड) | ९२६००१६३२३ |
| वैशाली मलबारी (पेण) | ८९८३९३६४५५ |
| अल्ताफ चोरडेकर (रोहा) | ८८०५२४९५६७ |
| सिद्धी दाखिणकर (माणगाव) | ७४९९३११८१७ |
| महेश पवार (नागोठणे) | ९२२५४७००३७ |

स्पर्धेचे स्वरूप
■ आपण आमच्याकडे पाठविलेल्या गणपतीच्या फोटोला 'कृषीवल'मध्ये प्रसिद्धी दिली जाईल.
■ स्पर्धा २८ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर २०२५ या कालावधीत घेतली जाईल.

फोटो पाठविण्याची वेळ स. १०.३० ते संध्या. ५.३० वा. पर्यंत.

स्पर्धेसाठी फोटो तुम्ही कृषीवल कार्यालय, वेश्वी किंवा krushivalganesh@gmail.com या इमेलवर पाठवा
अधिक माहितीसाठी संपर्क : 8975816900/9175708906

# मराठ्यांना काय मिळाले?

जरांगे यांच्या मुंबईच्या आंदोलनातून मराठ्यांना काय मिळाले याचे स्पष्ट उत्तर 'जवळपास काहीही नाही', असे आहे. 'आपण जिंकलो', असे म्हणून मनोज जरांगे यांनी उपोषण संपवले. हजारो आंदोलकांनी गुलाल उधळून जल्लोष केला. पण आता जेव्हा ते घरी पोचून शांतपणे विचार करतील तेव्हा सरकारने आपल्याला पुन्हा एकवार गंडवले आहे हे त्यांच्या लक्षात येईल. अर्थात त्यांना हा विचार करायचा आहे का हाही प्रश्नच आहे. गेल्या वर्षी जानेवारीमध्ये लोकसभा निवडणुकांच्या आधी जरांगे याच रीतीने मुंबईवर स्वारी करण्यासाठी निघाले होते. एकनाथ शिंदे यांनी त्यांना नवी मुंबईत थोपवले. त्यांच्या हातात एक सरकारी कागद दिला. त्याच्या आधारे सगेसोयऱ्यांनाही आरक्षण मिळावे ही आपली मागणी मान्य झाली असा गजर जरांगे व त्यांच्या समर्थकांनी केला. शिंदे यांच्यावर गुलाल उधळला. पण पंधराच दिवसात तो कागद बोगस आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्या तथाकथित आदेशाचे गॅझेटमधील परिपत्रक अजूनही लागू होऊ शकलेले नाही. कारण, त्या आदेशाला आठ लाख हरकती आल्या आहेत. या हरकती कोणी घेतल्या आहेत हे सांगण्याची वेगळी गरज नाही. भाजपने ओबीसींचे रक्षण करण्याच्या नावाखाली आपल्याच कार्यकर्त्यांना या हरकती घ्यायला लावल्या हे उघड गुपित आहे. गुणवंत सदावर्ते यांच्यासारखे भाजपचे पाळीव वकील त्यासाठी उपयोगी पडत असतातच. हा इतिहास ताजा असूनही जरांगे पुन्हा त्याच सापळ्यात अडकले आणि जिंकलो, जिंकलो असे ओरडत म ाघारी निघून गेले. हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर किंवा सरकारी आदेश काल जरांगे यांच्या हातात ठेवण्यात आला. मंत्रिमंडळाच्या मराठा उपसमितीचे प्रमुख राधाकृष्ण विखे पाटील हे जरांगे यांना पाच दिवसांत पहिल्यांदाच भेटायला गेले. तिथे त्यांनी या जीआरचा मसुदा जरांगे यांच्या हातात ठेवला. याला जरांगे व आंदोलकांनी होकार दिला की त्याचा लगेच जीआर निघेल असे सांगितले. जीआर ही इतकी स्वस्त व नूडल्ससारखी लगेच तयार होणारी गोष्ट आहे हे या निमित्ताने महाराष्ट्राला कळले हे बरे झाले. एरवी शेतकऱ्यांना पावसाची नुकसानभरपाई देण्याचे आदेश महिनोन महिने रखडत असतात.

### दोघांच्याही सोईचे

हा मसुदा जरांगे यांच्या हातात ठेवण्याची वेळही मोठी नामी होती. तिकडे उच्च न्यायालयाने हा जीवनमरणाचा प्रश्न केला होता. दुपारी तीन वाजण्याच्या आत आंदोलकांना मुंबईबाहेर काढा असा तगादा लावला होता. आपण शांततामय आंदोलन करणार व कोर्टाचा सन्मान करतो असे जरांगे बोलून चुकले होते. त्यामुळे त्यांना हा आदेश मानणे क्रमप्राप्त होते. मात्र, माघार घ्यायची तरीही आपलाच विजय झाला हे आंदोलक गर्दीला दाखवणेही त्यांना गरजेचे होते. त्यामुळे सरकारने आणलेला कोणताही ते मान्य करणार हे उघड होते. दुसरीकडे, तसे न झाल्यास सरकारला पोलिसी कारवाई करावी लागणार होती. ती करताना काही गडबड होऊन आंदोलकांना इजा झाली असती तर महाराष्ट्र पेटला असता. त्यामुळे सरकारलाही तोडगा निघून जरांगेंना वाटेला लावण्याची घाई होती. शिवाय हे करताना सरकारने आपली फसवणूक केली अशी लाखो मराठी मतदारांची भावना होऊ नये याचीही काळजी घ्यावी लागणार होती. त्यामुळे हैदराबाद गॅझेट असा उल्लेख करून एक सरकारी कागद तयार करण्यात आला. त्याला जीआर असे म्हणण्यात आले. तो आपल्याला मान्य आहे असे जरांगे यांनी आपल्या अभ्यासकांकडून सर्व गर्दीच्या समक्ष वदवून घेतले व अखेर त्याला मान्यता दिली. प्रत्यक्षात या तथाकथित जीआरमुळे आंदोलनाची एका इंचानेही प्रगती झालेली नाही. माजी न्यायमूर्ती बीजी कोळसे पाटील यांच्यापासून ते असीम सरोदे यांच्यापर्यंत अनेकांनी हे स्पष्टपणे सांगितले आहे. हैदराबाद गॅझेट हा १८८० व ९० च्या काळातल्या मराठवाड्यातचे वर्णन करणारा जाडजूड सरकारी दस्तावेज आहे. निजामाच्या काळातील मराठवाड्यातील भौगोलिक स्थिती, तिथल्या जाती, लोकांचे व्यवसाय, शेती, पाणी यांची स्थिती याचे तपशीलवार वर्णन त्यात आहे. तेव्हाच्या औरंगाबाद किंवा बीड जिल्ह्यात मराठे, कुणबी, ब्राह्मण किंवा मुस्लिम इत्यादी किती आहेत त्यांच्या संख्या त्यात आहेत. गावनिहाय किंवा प्रदेशनिहाय संख्या दिलेल्या आहेत. सध्या सरकारी आर्थिक पाहणी असते तसा हा अहवाल आहे.

### हैदराबाद गॅझेटची धूळफेक

यामध्ये अर्थातच कोणाचीही नावे नाहीत. पण बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यात अमुक इतके कुणबी व अमुक इतके मराठा अशा नोंदी आहेत. त्यांच्या आधारे समजा अमुक गावात इतके कुणबी तेव्हा होते म्हणजे आता त्यांची लोकसंख्या इतक्या पटीने वाढली असेल असा तर्क करून त्याआधारे सध्याची अमुक अमुक कुटुंबे ही कुणबी आहेत असा निष्कर्ष काढायचा अशी ही कल्पना आहे. मात्र हे तत्व सरसकट लागू होणार नाही. होऊही शकत नाही. त्यासाठी देखील आज आरक्षण मागू पाहणाऱ्यांना आपल्या कुळाशिळाचे काही ना काही पुरावे द्यावे लागणार आहेत. त्यांची सरकारी समितीतर्फे छाननी होणार आहे. ही तपासणी किती दिवसात व्हावी याला कोणतेही बंधन नाही. त्यामुळे हे सहजी होणारे नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे न्यायमूर्ती शिंदे समितीची २०२३ मधील स्थापना याचसाठी झाली होती. त्यांनाही हैदराबाद गॅझेटचा आधार घेण्यास सांगण्यात आले होते. गावपातळीवर सातबाराचे उतारे, शाळांचे दाखले, पोलिसांची रेकॉर्ड्स, इतकेच काय तुरुंगांची रेकॉर्ड्स इत्यादी तपासून कोणत्याही कुटुंबाची नोंद कोठेही कुणबी म्हणून आढळते का हे त्यांना तपासायचे होते. हे काम मराठवाड्यातच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्रभर करण्यात आले. त्यातून एकूण ५८ लाख नोंदी सापडल्याचा आकडा सांगितला जातो. मात्र यात नवीन नोंदी किती हा महत्वाचा प्रश्न आहे. कारण, कुणबी नोंदी असलेल्या मराठ्यांना राखीव जागांसाठी कुणबी हे प्रमाणपत्र देण्याचा निर्णय २००३पासून अस्तित्वात आहे. राज्यभरातील कुणबी-मराठ्यांनी त्याचा फायदा घेतला आहे. या ५८ लाखांमध्ये पूर्वापार फायदा घेतलेले किती व नव्या नोंदी किती हे आजतागायत स्पष्ट झालेले नाही. उलट मराठवाड्यात जेमतेम काही हजार नव्या कुणबी नोंदी सापडल्या अशा बातम्या पूर्वी प्रसिध्द झाल्या आहेत. आता नव्याने हैदराबाद गॅझेट लागू झाल्याचा गाजावाजा केल्यामुळे एकाएकी नोंदी वाढतील अशी अपेक्षा करणे व्यर्थ आहे. कारण, ज्यांना शक्य आहे त्यांनी यापूर्वीच सर्व ते प्रयत्न करून नोंदी मिळवल्या आहेत व करून घेतल्या आहेत. पण वर म्हटल्याप्रमाणे जरांगे यांना उपोषणातून बाहेर पडण्यासाठी काहीतरी मार्ग हवा होता. तो सरकारने त्यांना मिळवून दिला. बाकीच्या जितक्या मागण्या मान्य झाल्याचे सांगितले जात आहे त्या गेल्याच वर्षी शिंदे यांनी मान्य केल्या होत्या. मग त्यांची अंमलबजावणी आजवर का झाली नाही असा प्रश्न शिंदे किंवा जरांगे यांना कोण विचारणार? सध्या तरी सगळे गुलाल उडवण्यात मग्न आहेत.

**विचार**

# भारत-चीन संबंध नव्या वळणावर

***अमेरिकेने लादलेल्या प्रचंड टॅरिफच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे शांघाय सहकार्य परिषदेसाठी चीनला जात आहे. गलवान खोऱ्यातील चकमकीनंतर आता भारत आणि चीनचे संबंध सुधारत आहेत. मोदी यांच्या दौऱ्यात भारत आणि चीनमध्ये सीमाप्रश्न तसेच अन्य बाबतीत काही धोरणात्मक निर्णय घेतले जातील. भारताच्या बाबतीत अमेरिकेला जे स्थान होते, ते स्थान चीन घेऊ शकेल का, याची आता चर्चा सुरू झाली आहे.***



**प्रा. जयसिंग यादव**

बहुपक्षीय व्यापार व्यवस्था राखण्यासाठी चीन भारतासोबत खंबीरपणे उभा राहील, असे वक्तव्य भारतातील चीनचे राजदूत झू फेहोंग यांनी अमेरिकेने भारतावर लादलेल्या आयात शुल्कवाढीविरुद्ध बोलताना केले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'टॅरिफ वॉर'नंतर भारत आणि चीन अधिक जवळ यायला लागले आहेत. चीन ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था आहे. अमेरिकेची संरक्षण तसेच अन्य साहित्याची बाजारपेठ चीनने काबीज केली आहे. दुसरीकडे, रशिया हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा अण्वस्त्रसज्ज देश आहे. चीन, रशिया आणि भारत हे तीन देश एकत्र येऊ नयेत, यासाठी आतापर्यंत अमेरिकेने व्यूहनीती रचली. दक्षिण आशियातील चीनचा वाढता हस्तक्षेप थांबवण्यासाठी तर अमेरिकेने भारताला मदतीचा हात पुढे केला होता. अमेरिकेला पाकिस्तानची तेवढी गरज राहिली नव्हती. रशियापासून भारताला दूर करता आले, तर करावे हा ही अमेरिकेचा हेतू होता. रशिया मित्र असला, तरी भारताने अमेरिकेशी व्यापार वाढवला होता. संरक्षण साहित्याची खरेदीही वाढवली होती. अशा परिस्थितीत ट्रम्प यांच्या आयात शुल्कवाढीमुळे तसेच अन्य बेताल बडबडीमुळे भारत दुखावला. भारताची रशियाशी जवळीक आणखी वाढली. चीननेही अमेरिकेला शह देण्यासाठी भारताशी संबंध सुधारण्याची इच्छा व्यक्त केली. भारताची बाजू घेत चीनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारतात येऊन काही करार केले. आता नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य परिषदेसाठी चीनला जात आहेत. अशा वेळी भारतासाठी चीन अमेरिकेचे स्थान घेऊ शकेल का, अशी चर्चा सुरू झाली असली, तरी पूर्वानुभव पाहता व्यापार सहकार्य करताना चीनवर किती विश्वास ठेवायचा, हा प्रश्न आहे.

गलवान संघर्षानंतर तीन प्रमुख खिंडींमधून भारत आणि चीनमधील व्यापार थांबला होता. आता तो पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांनी नवी दिल्ली येथे भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल आणि मोदी यांची भेट घेतली. विस्तृत चर्चेनंतर एक संयुक्त दस्तावेज जारी करण्यात आला. दस्तावेजात म्हटले आहे की दोन्ही देशांनी सीमा व्यापार पुन्हा सुरू करण्यास सहमती दर्शवली आहे. हा व्यापार तीन नियुक्त मार्गांनी होईल. अमेरिकन टॅरिफविरुद्ध आवाज उठवणाऱ्या देशांमध्ये चीन आघाडीवर आहे. दोन्ही देशांमधील कटुता इतकी वाढली होती, की अमेरिकेने चिनी वस्तूंवर १४५ टक्के कर लादला होता तर चीनने अमेरिकन उत्पादनांवर १२५ टक्के कर लादला होता. त्यानंतर मे २०२५ मध्ये जीनिव्हा येथे झालेल्या बैठकीत दोन्ही देशांनी व्यापार कराराअंतर्गत टॅरिफ कमी केले. असे असूनही दोन्ही देशांमधील टॅरिफचा प्रश्न पूर्णपणे सुटलेला नाही. चीनने पुन्हा एकदा अमेरिकेविरुद्ध आवाज उठवला; परंतु या वेळी त्याने भारताची निवड केली. अमेरिकेची तुलना धमकावणाऱ्या खलनायकाशी करताना चीनचे मुत्सद्दी शू फेहोंग म्हणाले, की ते बऱ्याच काळापासून मुक्त व्यापाराचा फायदा घेत आहेत; परंतु आता ते इतर देशांकडून जास्त किमती मागण्यासाठी सौदेबाजीचे शस्त्र म्हणून टॅरिफचा वापर करत आहेत. अमेरिकेने भारतावर पन्नास टक्क्यांपर्यंत किंवा आणखी जास्त टॅरिफ लादण्याचा चीन तीव्र विरोध करतो. त्यांनी दोन्ही देशांचे वर्णन आशियातील आर्थिक विकासाचे डबल इंजिन म्हणून केले आणि सांगितले, की भारत आणि चीनमधील एकतेचा फायदा संपूर्ण जगाला होईल.

युक्रेन युद्धानंतर भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची आयात वाढवली होती. यामुळे अमेरिकेसोबतच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला आणि व्यापार करारावरील वाटाघाटींवर परिणाम झाला. भारताने युक्तिवाद केला की बायडेन प्रशासनाने जागतिक ऊर्जा बाजारपेठ स्थिर करण्यासाठी भारताला रशियन तेल खरेदी करण्यास सांगितले होते. मात्र आता युक्रेन युद्धात भारत रशियाच्या युद्धयंत्रणेला पाठिंबा देत असल्याचे अमेरिकेचे म्हणणे आहे. एकीकडे, भारताच्या अमेरिकेसोबतच्या व्यापारी संबंधांमध्ये अस्थिरता दिसून येत आहे, तर दुसरीकडे, भारत आणि चीनमधील संबंध वेगाने मऊ होत आहेत. २०२० मध्ये लडाखमधील गलवान येथे झालेल्या संघर्षानंतर दोन्ही शेजाऱ्यांमधील संबंध बिघडले. तेव्हापासून चीन आणि भारत हळूहळू संबंध सामान्य करण्याच्या दिशेने काम करत आहेत. चीन असो किंवा अमेरिका, दोन्ही देशांविरुद्ध जनतेच्या भावना तीव्र आहेत. लोक कोणाच्या विरोधात जास्त आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. चीनशी दीर्घकाळापासून सीमा वाद आहे, परंतु ट्रम्प आणि मोदी यांच्यात मैत्री असूनही एकतर्फी कर लादणे हे भारतासाठी धक्कादायक आहे. ट्रम्प यांनी भारतावर लादले तितके शुल्क भारताच्या शेजारील देशांवर लादले नाही. म्हणूनच येथे अमेरिकाविरोधी भावना चीनविरोधीपेक्षा कमी नाही. भारत आणि चीनमधील वाढत्या जवळीकतेशी संबंधित अनेक घटकांपैकी अमेरिका हा एक घटक आहे. गेल्या काही महिन्यांपासून दोन्ही देशांमध्ये सतत चर्चा सुरू होती.

चीन आर्थिकदृष्ट्या समृद्ध असून भारताचा एक महत्त्वाचा व्यापारी भागीदार आहे. अमेरिका आणि भारत यांच्यातील मजबूत भागीदारी, विशेषतः क्वाड (भारत, अमेरिका, जपान आणि ऑस्ट्रेलिया) सारख्या गटांद्वारे चीनच्या प्रादेशिक प्रभावाचे संतुलन साधण्याचा प्रयत्न करते. 'क्वाड' देश औपचारिक लष्करी युतीऐवजी अनौपचारिक गट म्हणून वावरतात; परंतु चीन याकडे स्वतःविरुद्धची काही देशांची युती म्हणून पाहतो. भारत आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढला तर ही भागीदारी कम कुवत होऊ शकते. त्यामुळे इंडो-पॅसिफिक प्रदेशात चीनचा प्रभाव वाढू शकतो. जपानदेखील ट्रम्प यांच्या १५ टक्के अमेरिकन टॅरिफवर खूश नाही. ट्रम्प ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांना भेटत नाहीत. परिणामी, सध्या क्वाडच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह लागले आहे. भारत आणि चीन 'ब्रिक्स'सारख्या संघटनांद्वारे 'ग्लोबल साउथ'च्या नेतृत्वात उभे रहात आहेत. दोन्ही देश 'ग्लोबल साउथ'च्या देशांना एकत्र करून पाश्चात्य देशांचे वर्चस्व संतुलित करतात. भारताने आतापर्यंत वेगवेगळ्या जागतिक व्यासपीठांवर धोरणात्मक स्वायत्तता राखण्याचा प्रयत्न केला आहे. एकीकडे, भारत अमेरिका आणि पाश्चात्य देशांसोबत 'क्वाड' संघटनेत सहभागी आहे, तर दुसरीकडे 'ब्रिक्स' आणि शांघाय सहकार्य परिषदेत चीन आणि रशियासोबत सहकार्य करत आहे. ही स्वायत्तता भारताला जागतिक व्यासपीठावर अधिक प्रभावशाली बनवते. कारण भारत पूर्णपणे पश्चिमेसोबत नाही किंवा चीनच्या नेतृत्वाखाली नाही.

अमेरिकेबरोबरच्या दुराव्यामुळे भारत आता सावधगिरीने पुढे जाईल. चीन आर्थिक महासत्ता बनल्यामुळे वरचढ आहे; परंतु 'ग्लोबल साउथ'चे नेतृत्व करण्याचा मार्ग चीनसाठी सोपा नाही, कारण 'ग्लोबल साउथ'च्या सर्व देशांचे चीनबद्दल समान मत नाही. चीनच्या 'गुआंचा' या प्रमुख वेबसाइटवर प्रकाशित झालेल्या एका अहवालात म्हटले आहे की ट्रम्प यांच्या पहिल्या कार्यकाळात भारताशी असलेल्या जवळच्या संबंधांचे फायदे आता मिळणार नाहीत. या बदलांचा फायदा चीनला होऊ शकतो. शू फेईहोंग यांनी 'एक्स'वरील पोस्टद्वारे अमेरिका आणि चीनशी होत असलेल्या भारताच्या व्यापाराची तुलना केली. या पोस्टमध्ये 'ग्लोबल टाईम्स'चे एक ग्राफिक आहे. त्यानुसार २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारत आणि चीनमधील व्यापार १२७.७१ अब्ज डॉलर्स होता, तर अमेरिका आणि भारतातील व्यापार १३२.२१ अब्ज डॉलर्स होता. तथापि, अमेरिका भारतासाठी सर्वात मोठा निर्यातदार आहे, तर गेल्या काही वर्षांमध्ये चीनसोबत भारताची व्यापार तूट सतत वाढत आहे. अशा परिस्थितीत प्रश्न असा आहे की चीन भारतासाठी अमेरिकेला पर्याय असू शकतो का? याचे उत्तर नाही असे आहे. त्याचे कारण चीन आणि पाकिस्तानमधील मैत्रीत कोणताही फरक पडणार नाही. त्यामुळे चीन कधीही अमेरिकेची जागा घेऊ शकत नाही.

**(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)**

**चर्चा आजची**

# मराठा आंदोलनाचा विजय!

**सुयोग आंग्रे**

हैदराबाद गॅझेटची अंमलबजावणी, सातारा संस्थान गॅझेटची अंमलबजावणी, आंदोलकांवरील खटले सप्टेंबर अखेरपर्यंत मागे घेणार, मराठा कुणबी एकच, यासह सहा मागण्या मान्य झाल्याचा अखेर शासन निर्णय जारी करण्यात आला. आणि गेल्या पाच दिवसांपासून आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले मनोज जरांगे-पाटील यांच्या आंदोलनापुढे फडणवीस सरकार नरमले. राज्य सरकारने आठपैकी सहा मागण्या मान्य केल्याने आंदोलकांनी आझाद मैदानावर जल्लोषाचा गुलाल उधळला. संपूर्ण राज्यभर या निर्णयाचे स्वागत करत जल्लोष करण्यात आला. मराठा बांधवांनी सीएसएमटी रेल्वे स्थानकाबाहेर फटाक्यांची आतषबाजी करत जल्लोष साजरा केला. आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांच्यासह शिष्टमंडळाने मंगळवारी आझाद मैदानावर जरांगे पाटील यांची भेट घेतली. मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन देत तातडीने जीआर जारी केल्याने जरांगे पाटील यांनी आंदोलन मागे घेतल्याचे जाहीर केले. दरम्यान, मराठा समाजाच्या एकूण ८ पैकी ६ मागण्या मान्य केल्याने जरांगे पाटलांच्या हजारो कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. 'पाटील पाटील' अशा घोषणांनी आझाद मैदान परिसरात दणाणून सोडला. आज मराठा समाजासाठी दिवाळी आहे, मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर मराठा बांधवांनी गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला. मराठा समाजाला ओबीसी समाजातून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवार २९ ऑगस्टपासून आझाद मैदानावर आंदोलन छेडण्यात आले. पाच दिवसांपासून आझाद मैदानावर जरांगे पाटील उपोषणावर बसले होते. हैदराबाद गॅझेटची तातडीने अंमलबजावणी व्हावी, मराठा कुणबी एकच याबाबत जीआर काढावा, सगेसोयरे अर्जांची छाननी करावी, मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावे, नोकरीत आरक्षण व मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी लढ्यात बलिदान दिलेल्या मराठा समाजाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी अशा मागण्या जरांगे पाटील यांनी राज्य सरकार समोर ठेवल्या होत्या.

आंदोलन संपूर्ण महाराष्ट्रातील मराठ्यांचं होतं, हे खरं. पण त्याला खरी ताकद दिली, ती मराठवाड्यातल्या गांवागांवातल्या मराठा ज्ञातीबांधवांनी. त्यांना आवश्यक 'शिदोरी' पोहोचवण्याचं काम मराठवाडा आणि मुंबईदरम्यानच्या जिल्ह्यातील मराठा संघटनांनी, विविध गटांनी केलं. मुंबईतूनही शेवटच्या दोन-तीन दिवसांत चांगली मदत केली गेली. मराठवाड्यातल्या गांवागांवातून या आंदोलनासाठी सर्व तयारीनिशी गाड्या भरून आंदोलक आले, ते हैदराबाद गॅझेटचा निकष मान्य व्हावा या प्रमुख अपेक्षेपोटी. हैदराबाद गॅझेट गृहीत धरण्याचं मान्य झालं, की त्यातील नोंदी ग्राह्य ठरतील आणि त्यानुसार वंश परंपरागत हक्कही आपोआप सिद्ध होतील, ही त्यामागची साधी भावना होती. सरकारने दिलेलं आश्वासन आणि तातडीने काढलेला शासन निर्णय (जीआर) पाहता मराठवाड्यातल्या बहुसंख्य मराठ्यांची ही मागणी मान्य झाली. सरकारी पातळीवर आतापर्यंत हैदराबाद गॅझेटमधील उल्लेख प्रमाण मानले जात नव्हते. गेल्या पाच दिवसांच्या आंदोलनाने स्वातंत्र्यपूर्व काळातील, निजामाच्या राजवटीतले हे गॅझेट आता अधिकृत आधार म्हणून मान्य झालं. आंदोलकांना आपल्या आंदोलनाचं हेच मोठं सार्थक वाटलं. स्वतः जरांगे यांनीही याच मुद्द्याचं महत्त्व अधोरेखित करून आपलं निर्जळी उपोषण सोडलं. मराठा आणि कुणबी एकच असून या मागणीचा जीआर काढण्यासाठी सरकारला २ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. हैदराबाद गॅझेटियरच्या अंमलबजावणीला उपसमितीने मान्यता दिली आहे.सातारा गॅझेटियरची अंमलबजावणी एका महिन्यात केली जाईल, असे आश्वासन सरकारने दिले आहे. या प्रक्रियेत कायदेशीर बाबी तपासल्या जातील. शिवेंद्रराजे भोसले यांनी याची जबाबदारी घेतली आहे.मराठा आंदोलकांवर दाखल झालेले गुन्हे सप्टेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत मागे घेण्यासाठी सरकार न्यायालयात जाणार आहे.मराठा आरक्षणासाठी बलिदान दिलेल्या कुटुंबांना एका आठवड्यात आर्थिक मदत दिली जाईल. तसेच, त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी दिली जाईल.५८ लाख नोंदींचे रेकॉर्ड ग्रामपंचायतींमध्ये लावले जाणार आहेत आणि जिल्हास्तरावर जातवैधतेची पडताळणी जलद गतीने होणार आहे.

थोडक्यात, राज्याचे राजकारण हलवून सोडणारा एक महत्त्वाचा तिढा सुटला आहे. पण, यामुळे सगळेच प्रश्न सुटले असे मात्र नाही.मूळ प्रश्न शेतीवर अवलंबून असलेल्या समाजांचा आहे. खरी चिंता शेतकऱ्यांच्या घरातील मुला-मुलींच्या योग्य शिक्षणाची, नोकरी व रोजगाराची आहे. जात हा फॅक्टर राजकारणाला आवडत असला तरी तो समाजात दुफळी, दुभंग तयार करतो. म्हणून सामाजिक सौहार्द आणि गरजूंच्या सर्वांगीण विकासासाठी जात बाजूला ठेवून या प्रश्नांचा विचार करावा लागेल. मुंबई या जागतिक व्यापार केंद्राची पाच दिवसांची कोंडी लक्षात ठेवून त्या दिशेने पावले टाकावी लागतील.

**लोकसंसद**

## सणाच्या पार्श्वभूमीवर दाखवलेल्या ऐक्याच्या कथित संदेशावर कितपत विश्वास ठेवावा ?

सध्या देशभरात गणेशोत्सव मोठ्या उत्साहात सुरू आहे. याच निमित्ताने हिंदू मुसलमान ऐक्याचे अनेक उदाहरणे, प्रसंग दाखविले जात आहे. विशेष स्तंभ लेखन आणि आता रिल्स मोठ्या प्रमाणात प्रसारीत होत आहे. लोकमान्य टिळक यांनी चालू केलेला सार्वजनिक गणेशोत्सवाचा मूळ उद्देश भारतीयांचे संघटन हा होता त्यामुळे भारतीयांच्या स्वतंत्र लढ्याला संघटनांचे बळ लाभले आणि त्याची परिणीती म्हणून भारत स्वतंत्र झाला. देशवासियांचे आराध्य असलेल्या आणि प्रथम पूजला जाणारा गणपती हा भारतीय मनांना एकत्र आणणारा दुवा असल्याचे हेरून लोकमान्य टिळक यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाला प्रोत्साहन दिले. सार्वजनिक गणेशोत्सवाची एकीची, संघटनांची ही परंपरा आजतागायत सुरू आहे. हिंदू समाजाचे शक्तीस्थान आणि संघटन यांचे प्रतीक असलेला गणेशोत्सव हा अलीकडच्या एक-दोन दशकापासून हिंदू मुसलमान सौहार्दाचे प्रतीक म्हणून दाखविला जात आहे. हिंदू धर्म सहिष्णू असल्याने आतापर्यंत हिंदूंना संख्या प्रबळल्याच्या आधारे कुणावरही वर्चस्व ठेवण्याची अथवा दाखवण्याची शिकवण दिलेली नाही. त्यामुळेच कधीही कुठल्या पंथीयांवर कोणत्याही प्रकारची बळजबरी केल्याचे उदाहरण इतिहासात पाहायला मिळत नाही तरीही आज गणेशोत्सव, होळी,दिवाळी या सणांच्या वेळी हिंदूंपर्यंत हिंदू-मुसलमान ऐक्याचा संदेश पोचवण्याचा प्रयत्न केला केला जातो. साम्यवादांनी जाणीवपूर्वक हिंदूंच्या बुद्धिभेद केल्याची अनेक उदाहरणं आहेत. हा बुद्धिभेद हिंदूंच्या मनावर इतका बिंबला आहे की आपण आत्मघात करत आहोत याची साधी जाणीवही हिंदूंना होत नाही. त्यामुळे भारतीय संस्कृतीवर व्हिडिओ बनवणारे 'रील स्टार' कथित हिंदू मुसलमान ऐक्याला प्रसारीत करतात आणि हिंदू त्याला भुलतात त्यामुळेच हिंदूंनी हिंदू-मुसलमान ऐक्याच्या पिशाच्चदीपिकांना म्हणजेच ढोंगी सौंदर्याला भुलू नये. सामाजिक माध्यमांवरील प्रत्येक व्हिडिओ डोळसपणे पाहावा आणि आंधळेपणाने हिंदू मुसलमान ऐक्याच्या कथित संदेशावर विश्वास ठेवू नये, कारण प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळी असू शकते. हिंदूंच्या श्रद्धेचा अपमान करून त्याला सौहार्द अशी रंगीत झुल लावणाऱ्यांचा खरा हेतू समजून घ्यावा.

**– लीना मकरंद गाडगीळ, पनवेल**

**दिनविशेष**

# अर्थशास्त्रज्ञ दादाभाई नौरोजी

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे एक संस्थापक, थोर नेते व अर्थशास्त्रज्ञ. दादाभाई नौराजी यांचा जन्म ४ सप्टेंबर १८२५ रोजी मुंबईत एका पारशी कुटुंबात झाला. वडील नौरोजी पालनजी दोर्दी आणि आई माणेकबाई. दादाभाई चार वर्षांचे असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. प्रतिकूल परिस्थितीतही माणेकबाईंनी दादाभाईंचे संगोपन केले आणि शिक्षण पार पाडले. वयाच्या अकराव्या वर्षी दादाभाईंचे शोराबजी श्रॉफ यांच्या सात वर्षांच्या गुलाबीनामक कन्येबरोबर लग्न झाले. दादाभाईंना एक मुलगा आणि दोन मुली अशी तीन अपत्ये झाली. एल्फिन्स्टन इन्स्टिट्यूशन



आणि एल्फिन्स्टन महाविद्यालय यांमधून शिक्षण घेऊन १८४५ मध्ये ते पदवीधर झाले. १८५० साली एल्फिन्स्टन महाविद्यालयात दादाभाईंची गणित व तत्त्वज्ञान या विषयांचे सहाय्यक प्राध्यापक म्हणून नेमणूक झाली. या महाविद्यालयात प्राध्यापकपदावर नेमलेले दादाभाई हे पहिले भारतीय होत.

दादाभाई १८५५-५६ च्या सुमारास कामा यांच्या लंडनमधील व्यवसायातील एक भागीदार म्हणून लंडनला गेले तेथे त्यांचा 'मँचेस्टर कॉटन सप्लाय असोसिएशन', 'कौन्सिल ऑफ लिव्हरपूल', 'अथेनियम', 'नॅशनल इंडियन असोसिएशन' इ. संस्थांशी जवळचा संबंध आला. १८६५-६६ पर्यंत त्यांनी लंडनच्या युनिव्हर्सिटी कॉलेजमध्ये गुजरातीचे प्राध्यापक म्हणून काम केले. १८६५-७६ या काळात व्यवसायानिमित्त दादाभाईंच्या इंग्लंडला अनेकदा वाऱ्या झाल्या. १८६५ साली लंडनम ध्ये डब्ल्यू. सी. बॅनर्जी यांच्यासमवेत दादाभाईंनी 'लंडन इंडिया सोसायटी' ही संस्था स्थापली. १९०७ पर्यंत ते तिचे अध्यक्ष होते. १८६२ मध्ये दादाभाई 'कामा अँड कंपनी' तून बाहेर पडले आणि त्यांनी 'दादाभाई नौरोजी अँड कंपनी' अशी स्वतःचीच कंपनी उभारली. १८६६ म ध्ये त्यांनी लंडनमध्ये 'ईस्ट इंडिया असोसिएशन' या संस्थेची स्थापना केली ते तिचे सचिवही होते. १८७३ मध्ये भारतीय अर्थकारणाविषयी नेम लेल्या संसदीय समितीपुढे (फॉसेट कमिटी) दादाभाईंनी साक्ष दिली.

ही समितीदेखील त्यांच्या परिश्रमांचेच फलित होते. भारतीय अर्थशास्त्रीय विचारधारेमधील दादाभाईंचे मौलिक कार्य म्हणजे त्यांनी केलेले भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचे निर्धारण. निरनिराळी मंडळे, समित्या व संस्था ह्यांमधून त्यांनी दिलेली व्याख्याने दादाभाई नौरोजीज स्पीचेस अँड रायटिंग्ज ह्या शीर्षकाने ग्रंथनिविष्ट झाली आहेत. एक समाजसुधारक म्हणून दादाभाईंचा लौकिक होता.

जातिनिष्ठ मर्यादा पाळणे त्यांना मान्य नव्हते. स्त्रीपुरुष-समानता, स्त्रीशिक्षण यांचा त्यांनी सतत पुरस्कार केला. 'द स्ट्यूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' ह्या संस्थेच्या वतीने त्यांनी मुलींसाठी तीन मराठी व चार गुजराती शाळा उघडल्या. दादाभाईंच्या ह्या समाजकार्याला जगन्नाथ शंकरशेट यांसारख्यांनी मोठा हातभार लावला. परकीयांच्या वर्चस्वाखालील भारतातील आर्थिक घटनांच्या विशदीकरणाची किती नितांत आवश्यकता आहे, ते दादाभाईंनी आपल्यानंतरच्या अर्थशास्त्रज्ञांना दाखवून दिले. आर्थिक प्रक्रियेचे वास्तव व परिपूर्ण चित्र त्यांनी उभे केले. 'भारताचे श्रेष्ठ पितामह' हे सार्थ बिरुद त्यांना लावण्यात येते. भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाच्या इतिहासात त्यांचे नाव आणि कार्य चिरंजीव स्वरूपाचे आहे. अशा या महान अर्थशास्त्रज्ञाचे ३० जून १९१७ रोजी निधन झाले.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## सुवर्णकण



सर्व सत्ता आली हाता ।
झाला सत्य संकल्पाचा दाता ।
ही स्थिती अत्यंत दुर्लभ असते
आणि ज्यांना ही स्थिती प्राप्त होते
ते कधीच चमत्कार करून दाखवित नाही.

**श्रीज्ञानेश्वर भावहृदय**
**आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम,**
**दातार आळी, पेण**

# गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या...



गौराईसह गणरायाचे आरती व पूजन करताना महिला व गणेशभक्त तसेच नदीमध्ये गौराईसह बाप्पाचे विसर्जन करताना. (छायाचित्र : समीर मालोदे)



## चिरनेर येथील बाप्पांना भावपूर्ण निरोप

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील चिरनेर येथील पाच दिवसांच्या गौरी गणपतींना मंगळवारी सायंकाळी भावपूर्ण निरोप देण्यात आला. अत्यंत मंगलमय व शांततापूर्ण वातावरणात सोरला तलाव आणि गणपती देवाचा तलाव या विसर्जन तलावात अत्यंत भक्तीभावाने गणेश विसर्जन कार्यक्रम पार पडला. तालुक्यातील अनेक गणेशमूर्तींचे विसर्जन गावाजवळील नदी, तलाव या ठिकाणी करण्यात आले. दरम्यान पावसाने गणपती विसर्जनाच्या वेळेला उघडीप दिल्यामुळे बाप्पाचे विसर्जन व्यवस्थितरित्या करता आले. त्यामुळे गणपती विसर्जनाला गणेशभक्तांचा उत्साह अधिक दिसून आला. गणेश भक्तांच्या सोयीकरता नागरिकांसह पोलीस प्रशासनाने व ग्रामपंचायत प्रशासनाने अधिक दक्षता व खबरदारी घेतल्याचे दिसून आले.

## गौरी गणपतींचे खड्ड्यातून विसर्जन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड आगरदांडा अंतर्गत रस्त्यांवर मोठे खड्डे पडल्याने गौरी गणपती बाप्पाचे विसर्जनाकरिता या खड्ड्यातून जावं लागल्याने ग्रामस्थांसह भक्तगणांनी नाराजी दर्शवली आहे.



मुरुड तालुक्यातील आगरदांडा ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्ता गेले १५ वर्षांपासून नव्याने बनला नसल्याने या रस्त्यावर खड्डेचखड्डे पडू लागले. या रस्त्यावरुन पादचारी व वाहन चालकांना गाडी चालवताना मोठी कसरत करावी लागत आहे. ग्रामपंचायतीचे या रस्त्याकडे दुर्लक्ष होत असल्याने खड्डे मोठ्या प्रमाणात होऊ लागले आहेत.

कोकणात गणेशोत्सव सर्वात मोठा सण. या दिवशी प्रत्येकांच्या घरी गणपती बाप्पांचे आगमन होत असते. हे माहित असून सुद्धा ग्रामपंचायतीकडून रस्तावर पडलेले खड्डे डांबर व खड्डी टाकून बुजविण्याचा प्रयत्न ही केला नाही. गौरी गणपती बाप्पा विसर्जनकरिता निघालेल्या गणेशभक्तांना या खड्ड्यातून मार्ग शोधावा लागल्याने ग्रामस्थांसह भक्तगणांनी नाराजी दर्शवली आहे. तीन दिवसांनी अनंत चतुर्थीच्या गणपती बाप्पांचे विसर्जन होणार आहे त्या आधी ग्रामपंचायतीकडून रस्तावरचे खड्डे बुजावावे, अशी मागणी भक्तगणांनी केली आहे.

आगरदांडा सरपंच आशिष हेदुळकर यांना या संदर्भात विचारणा केली असता ते म्हणाले की, गणपती बाप्पांच्या आगमनच्या आधी रस्त्यावरचे खड्डे बुजवावे असे ग्रामसभेत ठरले होते. त्याप्रमाणे रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविले गेले. परंतु सतत जोरदार पावसामुळे खड्ड्यात टाकलेली बुरुम व कॉरलेस वाहुन गेल्याने रस्त्यावर पुन्हा खड्डे दिसू लागले आहेत.



## गौरी गणपतींचे आनंदात विसर्जन

**मुरूड** : मुरुड शहरासह तालुक्यातील गौरी गणपती बाप्पाचे मोठ्या उत्साहात विसर्जन करण्यात आले. गेले कित्येक दिवस पावसाने धुमाकूळ घातला होता. परंतु, बापाच्या कृपेने दोन दिवस पावसाने विश्रांती घेतल्यामुळे गणेश भक्तांसाठी आनंदाची बाब ठरली व ‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर’, अशा घोषणा देत मोठ्या उत्साहात आनंदात विसर्जन करण्यात आले.

## शिवकृपा गौरी मंडळाचा रामसेतू देखावा

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण तालुक्यातील खोपटे गावातील शिवगौरा उत्सव प्रसिद्ध आहे. दरवर्षी या उत्सवाची सर्व भाविक भक्त मोठ्या उत्साहाने वाट पाहत असतात. उरणच्या खोपटा गावातील पाटील पाड्यात शिवकृपा गौरा मंडळाच्या माध्यमातून साजरा होणारा शिवागौरा उत्सव यावर्षी ८४ व्या वर्षीचा देखावा म्हणून वानर सेनेने प्रभू श्रीरामांना लंकेत जाण्यासाठी जो समुद्रातून रामसेतू तयार केला होता; तो रामसेतू बांधतांना साक्षात समुद्र देव प्रसन्न झाल्याचा प्रसंग साकारण्यात आला आहे.




समुद्रदेवाला प्रसन्न करून रामसेतू बांधण्यात आला होता अशी आख्यायिका आहे. त्यावर आधारीत रामसेतू बांधण्यापूर्वी प्रभू श्रीराम हे समुद्रदेवाला प्रसन्न करतानाचा देखावा साकारला आहे. या देखाव्यात प्रभू श्रीराम, बंधू लक्ष्मण, समुद्रदेव आणि हनुमंतराया अशा चार मूर्ती साकारल्या गेल्या आहेत. या सर्व मूर्ती खोपटा गावातील म्हात्रे पाड्यातील भाया पेंटर यांच्या कारखान्यात तयार करण्यात आल्या आहेत. तर मुख्य पूजनाची मुर्ती असलेली शिवमूर्ती ही श्री गणेश आणि पार्वती मातेसह अतिशय हुबेहूब साकारण्यात आली आहे. यावर्षी गौरा मंडळाचे ८४ वे वर्ष आहे.



## सात दिवसांच्या गणपती बाप्पांना निरोप

**| कर्जत | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात गेली सात दिवस आनंदात राहणाऱ्या बाप्पाला आणि काल पाहुणी म्हणून आलेल्या गौराई मातेला मंगळवारी निरोप देण्यात आला. तालुक्यांत सहा हजार ७६ सात दिवसांच्या गणपती बाप्पा तसेच २६१९ गौरींचे वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले. तालुक्यातील आठ सार्वजानिक गणेश उत्सव मंडळांच्या गणेशमूर्तींचे देखील विधिवत विसर्जन करण्यात आले. तर नेरळ येथील मुस्लिम मस्जिद समोर गणेशभक्तांना गुलाब पुष्प देण्याचा सोहळा पार पडला.

## खरोशी परिसरात गौरी गणपतींचे विसर्जन

**खरोशी** : ‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, गणपती चालले गावाला चैन पडेना आम्हाला’, या



जयघोषात वाजत गाजत गुलाल बुक्का फुले उधळत भजन म्हणत खरोशी परिसरातील ५० ते ६० गावातील गणपती बाप्पा व गौराई मातेचे मोठ्या आनंदात आणि उत्साहाच्या वातावरणात तसेच परंपरा व संस्कृती राखत डोक्यावर बाप्पाला व गौराईला घेऊन मनोभावे निरोप दिला. यावेळी कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठिकठिकाणी चोख पोलीस बंदोबस्तदेखील तैनात करण्यात आला होता. पेण तालुक्यातून ११ सार्वजनिक, ९हजार२५ खाजगी बाप्पांचे आज विसर्जन करण्यात आले, तर दोन हजारहून अधिक गौराईंचेदेखील विसर्जन करण्यात आले.



## कर्जतमध्ये गौरी गणपतींना निरोप

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यात सुरू असलेल्या गणेशोत्सवमध्ये मंगळवारी गौरी गणपतीसह आलेल्या बाप्पांना वाहत्या पाण्यात आणि तलावांमध्ये निरोप देण्यात आला. तालुक्यात कर्जत नगरपरिषद, नेरळ ग्रामपंचायत आणि दहिवलीतर्फे वरेडी ग्रामपंचायतीकडून सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत तालुक्यात कर्जत पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या शहर आणि गावात घरगुती विराजमान झालेले ३८५० गणपती बाप्पांचे तर सात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे आणि १३४६ गौराईचे नेहमीच्या उत्साहात विसर्जन करण्यात आले. नेरळ पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या गाव आणि आदिवासी वाड्यांच्या ठिकाणी विराजमान झालेले २१७० बाप्पांचे मंगळवारी सातव्या दिवशी विसर्जन करण्यात आले. त्याचवेळी १२५२ गौराई यांनादेखील साश्रू नयनांनी निरोप देण्यात आला. बहुसंख्य गौराई आणि गणेशमूर्तींचे प्रामुख्याने विविध नदी आणि नाले यातील वाहत्या पाण्यात विसर्जन करण्यात आले. माथेरान पोलीस ठाणे हद्दीत असलेल्या ६८ घरगुती बाप्पा आणि एक सार्वजनिक बाप्पा यांना निरोप देण्यात आला.



## १५० वर्षाची परंपरा असलेला अत्रे कुटुंबाचा बाप्पा

नेरळ : नेरळ येथे देश पारतंत्र्यात असताना गणेशोत्सव साजरा करण्यास सुरुवात झाली होती. अत्रे कुटुंबीयांकडून१८७४ मध्ये भाद्रपद महिन्यातील गणेशोत्सव साजरा होण्यास सुरुवात झाली होती. कर्जत तालुक्यातील नेरळ शहरामध्ये गणेशोत्सव मोठ्या आनंदात साजरा होत आहे. कै.मल्हार महादेव अत्रे यांनी सन १८७४ सालापासून सुरु केली. तेव्हापासून अत्रे परिवारात एक कुटुंब एक गणपती हि संकल्पना १८७४ मध्ये प्रत्यक्षात आणली. १८७४ सालापासून आजपर्यंत मयूरावर विराजमान झालेल्या मूर्तीच्या सर्वांग सुंदर स्वरूपात कुठलाही बदल न झाल्याचा सर्वांना अभिमान आहे.



## भक्तिमय वातावरणात गौरी गणपतीचे विसर्जन

**| कोलाड | प्रतिनिधी |**

गणेश चतुर्थीच्या दिवशी शनिवारी विराजमान झालेल्या गणरायाचे टाळ, मृदुंगाच्या गजरात पुढच्या वर्षी लवकर या असे म्हणत भक्तगणांनी आवडत्या बाप्पाला व मोठ्या जल्लोषात गौराईना निरोप दिला. यावेळी कोलाड, खांब, सुतार वाडी परिसरात विसर्जन स्थळांवार मोठी गर्दी झाली होती.

गणेश चतुर्थीच्या मोठ्या आनंददायी वातावरणात गणरायाची घरोघरी स्थापना केल्यानंतर यावर्षी तुरळक पाऊसाची रिमझिम सुरूच होती. परंतु या पावसात सुद्धा आपल्या बाप्पाच्या आगमनानंतर गणेश भक्तांनी दररोज मनोभावे पूजन, भजन, आरती, जागर आदी धार्मिक तथा अध्यात्मिक कार्यक्रम केले. तर भक्तांच्या डोक्यावर पाऊसाचे सावट असताना देखील कोलाड विभागातील एकूण घरगुती गणपती ११३८ व २५४ गौवराई ना तमाम गणेशभक्तानी भक्तीमय वातावरणात निरोप दिला आहे.



## साश्रूनयनानी गणरायाला भावपूर्ण निरोप

**म्हसळा** : गणेशचतुर्थीच्या दिवशी घराघरात विराजमान झालेले आणि माहेरवाशिणी म्हणून आलेल्या गौरींचे मंगळवारी पारंपरिक वाद्यांच्या तालावर आणि गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात म्हसळा शहरातील १०८० खासगी गणेशमूर्तींचे आणि ११० गौरींचे विसर्जन करण्यात आले. म्हसळा नगरपंचायत हद्दीतील हिंगूळडोह गणेश विसर्जन घाट, जानसई नदीपात्र गणेश विसर्जन घाट आणि खारगाव-सकलप बंदरावरील विसर्जन घाट असे तीनही विर्सजन घाटाच्या ठिकाणी निर्विघ्नपणे पार पडले. गौरी गणपतीच्या विसर्जनासाठी म्हसळा नगरपंचायतीने विशेष व्यवस्था केलेली होती. नगरपंचायत हद्दीतील विर्सजन घाटांवर चोख स्वच्छता ठेवण्यात आली होती.

# रोहा अष्टमीत गौरा नाचवण्याची परंपरा

**| रोहा | प्रतिनिधी |**

रोहा अष्टमीत गौरी गणपती विसर्जनाच्या दूसऱ्या दिवशी गौरा नाचवण्याची परंपरा आहे. रोह्याच्या धनगरआळीमध्ये आणि अष्टमीतील मराठा आळीत ही परंपरा अखंडितपणे सुरू आहे. भाविक मोठ्या श्रद्धेने या उत्सवात सहभागी होतात.

गौरा पार्वतीचा काका असल्याची आख्यायिका आहे. पिढ्यान्पिढ्या गौरा बसविण्याची व नाचवण्याची पारंपरिक परंपरा रोहा शहरातील धनगरआळी आणि अष्टमी मराठाआळी ग्रामस्थांनी आजही जपलेली आहे. गौरी गणपती विसर्जन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी गौरा धनगर आळीचे पाटील वसंत काफरे यांच्या मानाच्या गणपतीच्या ठिकाणी विराजमान केला जातो. गावात वाजतगाजत गौरा डोक्यावर नाचवण्याचा मान वखारदार कुटुंबाकडे आहे. हा गौरा नवसाला पावणारा असल्याने अनेकजण आपला नवस त्याच्या समोर फेडत असतात. त्याच दिवशी गौराचे शहरातील मानाच्या गणपतीबरोबर विसर्जन केले जाते. धनगर आळीत पार्वतीचा काका, गौरा बनविण्याचे व नाचविण्याचे मानकरी वखारदार कुटुंब गौराची मूर्ती तयार करतात. पेंड्यापासून बनवलेल्या गौऱ्याच्या मूर्तीला कपडे व मुखवटा लावून सजविले जाते. त्यांना खुर्चीत बसवून मानाच्या गणरायासमोर विराजमान केले जाते. मानाच्या गणपती विसर्जनावेळी मानकरी वखारदार कुटुंबातील सदस्य संतोष वखारदार गौरा डोक्यावर घेऊन नाचवितात.



## श्रीवर्धनमध्ये गौरीसह गणपतींचे विसर्जन

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन पोलीस स्टेशन हद्दीत ६४२ गौरींचे आणि २२५० गणपतींचे विसर्जन विविध ठिकाणी मोठ्या भक्तिमय वातावरणात करण्यात आले. शहरातील प्रत्येक आळीचे गट विसर्जनासाठी समुद्रकिनाऱ्यावर जात होते. विसर्जन मिरवणूकांसोबत टाळ मृदुंगाच्या तालावर भजने व आरत्याही म्हटल्या जात होत्या. श्रीवर्धन शहरातील गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये प्रख्यात सिनेनिर्माते व दिग्दर्शक राजेश मापुस्करही सहभागी झाले होते. समुद्र किनाऱ्यावर विसर्जनापूर्वी आरती करून भक्तिमय वातावरणात गणपतींचे विसर्जन करण्यात आले.

## निवडक



### भावपूर्ण वातावरणात गणरायाला निरोप

**तळा** : तळा तालुक्यात पाच दिवसांच्या गौरी गणपतींना भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला. यावर्षी तळा तालुक्यात पाच दिवसांच्या २७१२ गणेशमूर्तींचे व ११६ गौराईंचे तसेच एका सार्वजनिक गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. गणेशोत्सवासाठी शहरातील चाकरमानी मोठ्या प्रमाणावर आपल्या गावी परतले होते. पाच दिवस भक्तिभावाने गणरायाची आरती तसेच पूजा अर्चा करून मंगळवारी त्याची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. कोणी डीजेच्या तालावर, कोणी खालुबाजाच्या तालावर तर कोणी टाळ ढोलकीच्या गजरात भजन गात बाप्पाची मिरवणूक काढली. विसर्जन मिरवणुकीमध्ये पावसाने आवर्जून हजेरी लावली होती. शहरातील गणपतींचे मोदी तलाव, महादेव तलाव, पुसाटी तलाव या ठिकाणी विसर्जन करण्यात आले. तसेच, नगरपंचायतीकडून कृत्रिम तलावही तयार करण्यात आले होते. त्यालादेखील नागरिकांनी उत्तम प्रतिसाद देऊन आपल्या मूर्तीचे विसर्जन कृत्रिम तलावात केले.

### गौरी गणपतीचे जड अंतःकरणाने विसर्जन

**कोलाड** : संपूर्ण कोकणासह रायगड जिल्ह्यात गौरी गणपती उत्सव मोठ्या उत्साही वातावरणात साजरा करण्यात येतो. सात दिवस गणपती बाप्पांची मनोभावे पूजा, आरती करण्यात आली. त्याचप्रमाणे दिड दिवस गौराईची पुजा आरती करण्यात आली. रायगड जिल्ह्यातील समुद्र, नदी, तलावात ५०० पेक्षा अधिक ठिकाणी ७२ हजार ६४३, तर कोलाड परिसरात ११३८ गणपती बाप्पांचे आणि २५४ गौराईचे भक्तिमय वातावरणात विसर्जन करण्यात आले. तसेच, सर्वच गणपती विसर्जन घाटावर गणपती उत्सवापूर्वी स्वछता करण्यात आली होती.



पनवेलच्या वडाळे सरोवराजवळ गौरी गणपती विसर्जनासाठी मोठी गर्दी झाली होती. आपल्या लाडक्या बाप्पा शेवटपर्यंत पाहताना भाविकचे डोळे पाणावले. (छायाचित्र : राजेश डांगळे)



चिरनेर येथील गौरी बरोबरच्या गणपती बाप्पांना भावपूर्ण निरोप. (छायाचित्र : काव्य, पूर्वा)



लाडक्या बाप्पांसमोर आनंदी चिमुकली मुले. (छायाचित्र : मुकुंद रांजणे)



### विसर्जन सोहळ्यातून एकीचे दर्शन

**नेरळ** : कर्जत तालुक्यातील वारे गावातील ग्रामस्थांनी गणेश विसर्जन सोहळ्यात एकीचे दर्शन घडवले. डीजेच्या तालावर आबालवृद्ध भक्तांनी ठेका धरीत गौरी गणपती विसर्जन सोहळ्याला मोठी गर्दी केली. दरम्यान आगामी वर्षी गणेश उत्सव सोहळ्यात १०० टक्के पर्यावरणपूरक गणपतीमूर्ती आणण्याचे आणि सजावटी देखील पर्यावरणपूरक करण्याचा संकल्प स्थानिक तरुणांनी केला आहे. वारे गावातील सुमारे २०० गणेशमूर्तींचे विसर्जन मोठ्या भक्तिभावाने येथील तलावात करण्यात आले. त्याआधी गावातील विसर्जन करणाऱ्या गणपती बाप्पांची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत गावकरी, महिला, लहानगे, तरुण आणि तरुणी अशा सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग दिसून आला. प्रथमच गावात गणेश विसर्जनाची एकत्रित मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात व डीजेच्या तालावर गावकरी थिरकले आणि ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषात बाप्पाला निरोप देण्यात आला.

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे मुळे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत जमिनीचे विद्यमान मालक श्री.धर्मराज शंकर थळे, श्री.चेतन अशोक थळे, श्रीम.निकिता निखिल म्हात्रे, श्री.ओमकार अशोक थळे, श्री.संजय काशिनाथ गोंधळी, श्री.प्रविण काशिनाथ गोंधळी, श्रीम.सिमा अजित थळे, श्री.नितीन काशिनाथ गोंधळी, श्रीम.निता राजेश दिये, श्रीम.उज्वला परशुराम म्हात्रे, श्रीम. अंजली प्रभाकर भोईर, रा.खंडाळे, ता.अलिबाग, जि.रायगड यांचेकडून कायम स्वरूपी मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार |
|---|---|---|---|
| मुळे | ४७ | ०-४६-३०<br>पो.ख. ०-१०-४०<br>०-५६-७० | ११.३७ |

वरील मिळकत हि या खरेदीखताचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
दिनांक ०३/०९/२०२५

सही/-
**ॲड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे**
मो.नं.९८२२०१७१६१

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय
जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला,
एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई-०३२

क्रं.अपिल/डेस्क/आरटीएस/रिव्ही/१७४/२०२५ दिनांक :-२०/०८/२०२५

**जाहिर नोटिस**

प्रती
१.श्री. सुदाम रामचंद्र दाभणे
२.श्री. देविदास रामचंद्र दाभणे
दोघे मु.जयभवानी मंदीर, दत्तावाडी, कुळगांव बदलापूर (पूर्व) ता. अंबरनाथ जि ठाणे- ४२१५०३
३. श्रीमती. सोनाबाई उर्फ सविता श्रीपत पिंगळे मु.कोषाणे ता.कर्जत जि.रायगड
४. श्रीमती इंदुबाई जगन्नाथ सुरोशे मु.चामटोली, बदलापुर ता. अंबरनाथ जि. ठाणे
अर्जदार क्र.१ स्वत: करीता व अपेलंट क्र २ ते ४ यांचा अखत्यारी म्हणून **अर्जदार**

**विरूद्ध**

१. श्री. शिवाजी रामचंद्र दाभणे मयत तर्फे वारस
१/१ श्रीमती सुनिता शिवाजी दाभणे रा.कोषाणे ता.कर्जत.
१/२ सौ.वैशाली अनंता गावडे मु.टेंभरी, पो.चौक, ता.खालापुर जि.रायगड
१/३ सौ. शितल शैलेश कदम मु. संत गाडगे महाराज नगर, निपट रेल्वेस्टेशनजवळ माथेरान ता. कर्जत जि. रायगड
२.श्रीमती अनुसया धर्मा दाभणे मु. कोषाणे ता. कर्जत, जि. रायगड
३. श्रीमती सिंधुबाई हरिभाउ घोडविंदे मु. किकवी, ता. कर्जत जि. रायगड
४. रामदास गजानन दाभणे मु.कोषाणे ता.कर्जत, जि.रायगड
५. श्रीमती सुवर्णा रोहीदास दाभणे
६. रोशन रोहीदास दाभणे क्र.५ व ६ मु. सावरोली, ता. खालापुर जि. रायगड
७. श्रीमती. रंजना शंकर भोईर मु.वांजळे, ता.कर्जत जि.रायगड
८. श्री. जयंत अर्जुन भोईर मु.सुमन महल फ्लॅट नं.१४,५२ बंगला सोसायटी, पो. ता. पनवेल जि. रायगड
९. श्रीमती रिता कृष्णबहादुर सिंग
१०. श्रीमती रेखा श्यामबहादुर सिंग
११. श्रीमती उर्मिला विजयबहादुर सिंग
१२. श्रीमती सुजात चंद्रबहादुर सिंग **.... सामनेवाले**
क्र ९ ते १२ मु फ्लॅट नं.१ व २ अखलेश कुंज विक्रोळी पूर्व मु ४०००८३

**विषय:-** अपर जिल्हाधिकारी रायगड यांचे कडील आदेश क्रं.हक्कनोंद/अपील नं.३६०/२०२३, दि.१८/११/२०२४ चे विरुद्ध पुनरिक्षण अर्ज

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील पुनरिक्षण अर्जाची सुनावणी मा.अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १७.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वत: अगर वकीला मार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्या मार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहुन म्हणणे न मांडल्यास पुनरिक्षण अर्जाचे कामी आपणांस काही सांगणे नाही असे समजण्यात येवून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
**नायब तहसिलदार(अपिले)**
**कोकण विभाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ नारळ गोठे पाहिजेत-७०६६१३८३६८ * इलेक्ट्रिशन पाहिजे-७०६६१३८३६८

■ *PHARMACIST REQUIRED*
अलिबागमध्ये कामाला फार्मसिस्ट पाहिजे. अधिक माहितीसाठी संपर्क करा – ९३७०६५३०५८

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## जाहीर सूचना

असे सूचित करण्यात येते की, श्रीम. वंदना संजीव कनवर यांचेकरिता श्री. संजीव कनवर, अधिकृत स्वाक्षरीकर्ता तथा प्रकल्प अधिकारी यांच्या मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाजगी जमीन गट क्र. 164 करिता पोहोच रस्त्यासह पाण्याची पाईपलाईन, इलेक्ट्रिकल लाईन, रस्त्यालगत ड्रेनेज लाईन बांधकामासाठी आणि इतर उपयुक्त सेवा इ. कामाकरिता मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कं. नं. 158 ब, सर्व्हे क्र. 80 येथील 0.2684925 हेक्टर राखीव वनजमिन वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत वळती करण्याच्या प्रस्तावास भारत सरकार (एम.ओ.इ.एफ.सी.सी.) प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांचे पत्र क्र. ऑनलाईन प्रस्ताव नं. एफपी/एमएच/रोड/425862/2023, दिनांक 08/04/2024 आणि पत्र क्र. ऑनलाईन प्रस्ताव नं. एफपी/एमएच/रोड/425862/2023, दिनांक 24/09/2024 अन्वये अनुक्रमे तत्वत: मान्यता व अंतिम मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र शासन (वन विभाग), मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे वनवृत्त, ठाणे यांचेकडील आदेश जा. क्र. कक्ष-10/वसं/ब-20/प्र.क्र.98/24-25/52/2025-26 दिनांक 23/05/2025 अन्वये मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील कं. नं. 158 ब, सर्व्हे क्र. 80 येथे पाण्याची पाईपलाईन, विद्युत वाहिनी, नाले लाईन व इतर सेवांकरिता दळणवळण रस्ता बांधण्यासाठी वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत 0.2684925 हेक्टर राखीव वनजमीन वळतेकरण प्रस्ताव एकरेषीय (स्पदमंत) प्रकल्पास काम सुरु करण्याची (Working Permission) परवानगी सुद्धा देण्यात आलेली आहे. सदरची परवानगी खालील अटी/ शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन राहून देण्यात आली आहे-

1) सदर परवानगी प्रकल्पांतर्गत प्रस्तावित वळतेकरण वनक्षेत्रात कामे सुरु करणे पुरती मर्यादित आहे. आणि सदर परवानगी एक वर्षासाठीच म्हणजेच दि.23.05.2026 पर्यंतच वैध (Valid) राहील म्हणजेच सदर परवानगी दिनांक 24.06.2026 पासून आपोआप रद्द झालेचे समजण्यात येईल. सदर परवानगी जारी झाल्यानंतर एक वर्षाचे कालावधीत प्रकल्प यंत्रणेस केंद्र शासन तत्वत: व अंतीम मान्यता पत्रातील सर्व अटी व शर्तींची पूर्तता करुन राज्य शासनाकडून वळतेकरण आदेश प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. सदर परवानगीस मुदतवाढ देणे या कार्यालयाच्या अधिकारात येत नसल्याने एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतर प्रस्तावांतर्गत क्षेत्रात काम सुरु ठेवण्यासाठी या कार्यालयास पत्रव्यवहार प्रकल्प यंत्रणेस करता येणार नाही.

2) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.3 अन्वये 100 वृक्षांच्या लागवड व देखभाल करीता प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 7,19,194/- कॅम्पा प्राधिकरणाकडे दिनांक 09.07.2024 रोजी अदा केलेले आहेत.

3) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.4 अन्वये नक्त वर्तमान मुल्य अंतर्गत प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 2,99,879/- कॅम्पा प्राधिकरणाकडे दिनांक 09.07.2024 रोजी अदा केलेले आहेत.

4) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.7 अन्वये वृक्षतोडी करीता प्रकल्प यंत्रणेने रक्कम रुपये 24,080/- कॅम्पा प्राधिकरणाकडे दिनांक 24.06.2024 रोजी अदा केलेले आहेत. मौजे मापगाव, कं. नं. 158 ठ, सर्व्हे क्र. 80 मध्ये एकूण 86 वृक्षतोड होणार आहे.

5) केंद्रशासन पत्रातील अट क्रमांक 1.10 नुसार जिल्हाधिकारी - रायगड यांचेकडील दि.03.04.2025 रोजीचे वन हक्क कायदा, 2006 प्रमाणपत्र प्रकल्प यंत्रणेने सादर केलेले आहे. प्रस्तावांतर्गत वनक्षेत्रात पट्टेधारक/पात्र प्लॉट धारक इत्यादी येत असल्यास नियमानुसार पुर्नवसन / मोबदला देण्याची जबाबदारी प्रकल्प यंत्रणेची राहील. बाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केलेले आहे.

6) केंद्र शासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.11 ला अनुसरुन प्रकल्प यंत्रणेने सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार पर्यावरणीय मान्यता मिळविणेबाबत नमूद केले आहे. याबाबत प्रकल्प यंत्रणेने बंधपत्र सादर केले आहे.

7) प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावित क्षेत्रात कामे सुरु करण्यापुर्वी, उप वनसंरक्षक अलिबाग यांना कळविणे आवश्यक आहे. उप वनसंरक्षक अलिबाग यांनी कामे सुरु असताना प्रस्तावित वन जमिनीवर वनभंग झाला आहे का ते पाहणे. वनभंग झाल्याचे निदर्शनास आल्यास केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायु मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्र. 1.21 अनुसार कारवाई करतील.

8) प्रकल्पामुळे प्रकल्पांतर्गत क्षेत्रातील पक्षी / वन्यजीवांचे वस्तीस्थान नष्ट न होता अबाधित राहण्याकरीता काही उपाययोजना सुचविल्यास आवश्यक ती उपाययोजना प्रकल्प यंत्रणा करेल.

9) प्रकल्पांतर्गत वनक्षेत्रात प्रकल्प प्राधिकरणाकडून कामे करताना वनसंपदेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

10) केंद्रशासन तत्वत: मान्यता पत्रातील अट क्र. 1.1, 1.2, 1.5, 1.6, 1.8,1.9, 1.12, 1.13, 1.14, 1.15, 1.16, 1.17, 1.18 व 1.19 बाबत प्रकल्प यंत्रणेने दिलेले बंधपत्रातील मुद्द्यांबाबत प्रकल्प प्राधिकरणाकडून विहित कालावधीत पूर्तता केली जाईल याबाबत उप वनसंरक्षक, अलिबाग यांची जबाबदारी राहील.

उपरोक्त अटीं पैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (Non Compliance) उप वनसंरक्षक, अलिबाग हे वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत केंद्र शासनाचे पर्यावरण, वन व जलवायू मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडील Hand Book मधील परिच्छेद क्रमांक 1.21 अनुसार अहवाल सादर करतील.

**सदर जमिनीचा तपशील खालीलप्रमाणे :**

**तपशील**

| अनू. क्र. | तालुका | गाव | जुना सर्व्हे नं. | वन क्षेत्र (हेक्टर मध्ये) | वनाचा वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | अलिबाग | मापगाव | 80/158 B | 0.2684925 | राखीव वन |

वर नमूद तत्वत: मान्यता व अंतिम मान्यता पत्र केंद्र शासनाच्या www.parivesh.nic.in या संकेत स्थळावर आणि महाराष्ट्र शासन वनविभागाचे आदेश हे www.mahaforest.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

दिनांक : 04/09/2025
ठिकाण : मुंबई

सही/-
**श्रीम. वंदना संजीव कनवर यांचे करिता,**
**श्री. संजीव कनवर,**
**अधिकृत स्वाक्षरीकर्ता तथा प्रकल्प अधिकारी**
पत्ता:-२२०३, ए-विंग, चैतन्य टॉवर्स, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - 400025.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरू आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोत्रे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै |
|---|---|---|
| १३/१/क | एकूण क्षेत्र १-७८-०० हे.आर. | ०.९१ |
| १३/१/ब | एकूण क्षेत्र १-८०-०० हे.आर, या पैकी उबेद मुहम्मद हुसैन शेख यांचे मालकीचे खाते क्र.३६५ क्षेत्र ०-४०-०० हे.आर या मिळकतीबाबत | ०.२७ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ (तीन) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०४/०९/२०२५
ठिकाण : पनवेल

**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं ९०२८८१७९३०
पत्ता-शॉप नं.२३, प्लॉट नं.५१, कल्पतरू कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

## ग्रामपंचायत नवेदर नवगांव

जावक क्र.४६२/२०२५/०२६ दिनांक : ०३/०९/२०२५

**जाहीर प्रगटन**
**महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम १९६०**

ग्रामपंचायत नवेदर नवगांव, ता.अलिबाग जि.रायगड येथील सर्व नागरीकांना कळविण्यांत येते की, ग्रा.पं.कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या अर्ज व दिवाणी न्यायाधीश, क.स्तर अलिबाग रायगड यांचेकडील हुकूमनामा दिवानी दावा क्र.१०७/२०१७ प्रमाणे खालील रकान्यातील असेसमेंट रजिस्टरवरील मालमत्ता फेरफार करण्याचे ठरले आहे.

| अ. क्र. | गाव | घर क्र. | लांबी X रूंदी | मालमत्तेचे वर्णन | सद्यस्थितीत असेसमेंटवरील नाव | फेरफार व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नवेदर नवगांव | २५४ | ३६X१३, ३६X१३ गावठाण जमिन ३६X१३ | पक्के कौलारू एकमजली | कै.लाया श्रावण सुरेकर | श्री.पांडुरंग लाया सुरेकर |

वरील सर्व असेसमेंट फेरफार नोंदीबाबत कोणाला आक्षेप/तक्रार असेल तर हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून (१४) दिवसांच्या आत ग्रा.पं.कार्यालयात आपल्या मालकी पुराव्यासह लेखी हरकत घ्यावी. मुदतीनंतर काही तक्रार आल्यास अशा तक्रारी अर्जाचा विचार केला जाणार नाही यांची नोंद घ्यावी.

सही/-
**समिक्षा विनोद कवळे**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रामपंचायत नवेदर नवगांव**

सही/-
**सरपंच**
**सौ.प्रियांती आ.घातकी**
**ग्रामपंचायत नवेदर नवगांव**
**ता.अलिबाग जि.रायगड**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालय**
**जुने सचिवालय, विस्तार इमारत, पहिला मजला, एलफिस्टन कॉलेजच्या बाजूला, काळा घोडा, फोर्ट, मुंबई - ०३२**

क्रं.अपिल/डेस्क/आरटीएस/रिस्टो/४७२/२०२५ दिनांक :- १२.०८.२०२५

**जाहिर नोटीस**

प्रति,
१. श्री. मारुती तानाजी वाडेकर, रा. पहुर, पो. जामगांव, ता. रोहा, जि. रायगड
२. श्रीम. सुनंदा नंदकुमार टेंबे, रा. वाढवण, पो.तळाशेत, ता. माणगांव, जि. रायगड
३. श्रीम. सुगंधा बाळाराम नाक्ती, रा. जामगांव, ता. रोहा, जि. रायगड
४. श्रीम. अनिता महादेव मुंब्रे, रा. विळे, ता. माणगांव, जि. रायगड तर्फे अखत्यारी म्हणुन श्री महादेव बाळकृष्ण मुंब्रे, रा. वरची वाडी, विळे, ता. माणगांव, जि. रायगड. **... अर्जदार**

**विरुद्ध**

१. श्री गणेश शिवाजी वाडेकर, रा. सोमेश्वर सोसा. बी/५. मरोडा हिल्स, अंथोनी चर्च रोड, भांडूप टेंबीपाडा (प) मुंबई - ४०००७८
२. श्रीम. सुरेखा सुरेश वाडेकर, ३. श्री दिनेश सुरेश वाडेकर, ४. श्री विनायक सुरेश वाडेकर,
५. श्रीम. संध्या सुरेश वाडेकर, ६. श्रीम. मंजुळा सुरेश वाडेकर, ७. श्री. दिनेश सुरेश वाडेकर, क्र. २ ते ७ रा. श्रीगणेश विकास मंडळ, सोशीयल नगर, धारावी सायन, मुंबई.
८. श्रीम. आशाबाई बाळकृष्ण उतेकर, रा. सोमेश्वर सोसा. बी/५, मरोडा हिल्स, अंथोनी चर्च रोड, भांडूप टेंबीपाडा (प), मुंबई - ४०००७८.
९. श्री चंद्रकांत तानाजी वाडेकर, १०. श्रीराम तानाजी वाडेकर, क्र. ९ व १० रुम नं.२०१ दुसरा मजला बी विंग, साईसृष्टी हरिश्चंद्र अपार्टमेंट खर्डी गाव दिवा शिळ रोड, दिवा पूर्व जि. ठाणे ४००६१२
११. श्रीम. वनिता बाळाराम धनावडे, १२. श्रीम. चंद्रकला चंद्रकांत धांदरूत, क्र. ११ व १२ रा. पहूर, पो. जामगाव, ता. रोहा, जि. रायगड
१३. श्रीम. प्रणाली कृष्णा साळुंखे, मु. भागाड, ता. माणगाव, जि. रायगड. **... सामनेवाले**

**विषय :- या न्यायालयाकडे दाखल फेरतपासणी अर्ज क्र. आरटीएस/रिव्ही ४४४/२०२४ मध्ये आदेश दि. ०९/०४/२०२५ संदर्भात पुनःस्थापन अर्ज**

सामनेवाले यांस कळविण्यात येते की, वरील पुनःस्थापन अर्जाची सुनावणी मा. अतिरिक्त विभागीय आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांचे समोर त्यांचे जुने सचिवालय, १ ला मजला, विस्तार भवन, फोर्ट, मुंबई-३२ येथील कार्यालयात दिनांक १७.०९.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता होणार आहे.

वरील दिवशी व वेळी आपण स्वतः अगर वकीलामार्फत किंवा प्राधिकृत अभिकर्त्यामार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे, वरील तारखेस आपण हजर राहून म्हणणे न मांडल्यास पुनःस्थापन अर्जाचे कामी आपणास काही सांगणे नाही असे समजण्यात येऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

सही/-
**(वैभव गुहागरकर)**
नायब तहसिलदार (अपिले)
कोकण विभाग

**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात**
**कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये**
**पोट-कलम(१) या अन्वये द्यावयाची नोटीस**

**नोटीस** दावा क्रमांक १९/२०२४

श्रीम.लिलाबाई वसंत पाटील
हौ.सोसायटी, ब्राम्हणआळी,
ता.अलिबाग जि.रायगड — वादी/अर्जदार

विरूद्ध

१.श्री.सोराबजी वरजोरजी कासड
२.श्री.तुलशीदास विठ्ठलदास शेट
३.श्री.एम.जी.एच.घसवारे — प्रतिवादी/सामनेवाला
४.श्री.होमी मिनोचर कोमी सरीयत
५.श्री.बेंजन करजोरजी कासड
सर्व रा.शहापूर, पो.शहापूर, ता.अलिबाग जि.रायगड

**विषय :** मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | गट नंबर/ हिस्सा नंबर | क्षेत्र हेक्टर आर | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|
| मौजे शहापूर ता.अलिबाग | ५७८/८ | ०-५४-१० | ५.३७ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि.०५/०७/२०२४ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारीख २३/०९/२०२५ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमिन न्यायाधिकरण पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरून फर्मावित आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरूवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न रहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकण : अलिबाग
दिनांक : २०/०८/२०२५

सही /-
**(विक्रम पाटील)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**अलिबाग-रायगड**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक विश्वास विष्णु मोरे व प्रविण शिवाजी खेडेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे:

**मौजे-कामतपाडा तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ५७/७ | एकुण क्षेत्र ०-५१-०० हे आर पॉ | ०-४४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : ०४/०९/२०२५

खरेदीदारातर्फे वकील **ॲड.वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर. अमराई रोड,कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

खरेदीदारातर्फे वकील **ॲड.निलेश कान्हु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळमजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,भारत गॅस समोर अमराई रोड.कर्जत ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.शैलेश मोतीराम पाटील, श्री.शेखर मोतीराम पाटील, रश्मी रवी पाटील, श्री.महेश मोतीराम पाटील, श्री.प्रणय रवी पाटील यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागाव ता.अलिबाग | १५८८ | ०-५३-४० | ६.९२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

अलिबाग,
दिनांक : ०३/०९/२०२५

**ॲड.परेश अ.देशमुख**
**जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड**

## जाहिर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेंत येते की, आम्ही खालील सही करणार १.श्री.रियाज अमीरअली करमाली, रा.वांद्रे (पश्चिम), मुंबई २.श्री.असिफ अमिरअली करमाली, टिंगरेनगर, पुणे याद्वारे जाहिर करतो की,

आमचे सामाईक मालकीची व खुद्द ताबेकब्जा वहिवाटीची मौजे नेहुली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर ३/१ब/२, प्लॉट नंबर १ ते १०, क्षेत्र ०-५०-० हे.आर. या बिनशेती मिळकती विक्री करणेंबाबत आमचेपैकी श्री.आसिफ करमाळी यांचेसोबत श्री.अरविंद श्रीनारायण कोठारी, रा.वरळी, मुंबई यांचेसोबत दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी साठेकरार केलेला होता. सदरच्या साठेकरारानुसार ३०/१०/२०२४ पर्यंत नोंदणीकृत खरेदीखत करुन देणेंचे साठेकरारनुसार ठरले होते. परंतु वेळेमध्यें श्री.अरविंद कोठारी यांनी खरेदीखत नोंदणीकृत करुन न घेतलेमुळे आम्ही आमचे वकिलांमार्फत नोटीस पाठवून व्यवहार १५ दिवसांत पूर्ण करणेंचे कळविले होते. परंतु अद्यापही श्री. अरविंद कोठारी यांनी व्यवहार पूर्ण न केलेमुळे तसेच त्यांना वारंवार मोबाईल द्वारे तसेच प्रत्यक्ष भेटून दोन वेळा कळविले आहे. परंतु श्री. अरविंद कोठारी यांनी व्यवहारापोटी ठरलेली रक्कम अदा करुन आजतागायत कोणतेही खरेदीखत नोंदणीकृत केलेले नाही. या कारणास्तव आम्ही सदरचा दिनांक १८ सप्टेंबर २०२४ रोजी केलेला साठेकरार या जाहिर नोटीसीद्वारे रद्दबातल करीत आहोत.
हे तमाम जनतेस कळावे.

अलिबाग
तारीख : ०४/०९/२०२५

**श्री. रियाज अमीरअली करमाली**
१४,देवदूत, बी.जे.रोड, बांद्रा, मुंबई ४०००५०
मोबाईल नंबर ९३२४२४२३२३.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांना या जाहिर नोटीसने कळवण्यात येते की, पुढे वर्णन केलेल्या मिळकतीचे आमचे आशिल श्री.महादेव मधुकर पाटील, रा.श्रीगांव, ता.अलिबाग, जि.रायगड यांचे मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील पुढील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे श्रीगांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व त्याचा उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|
| ४२९ | ०.७८.९ | २.०५ |

पैकी आमचे आशिलांचे मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील दक्षिण दिशेकडील ०.४३.९ हे.आर. इतके क्षेत्र

येणेप्रमाणे वर्णन केलेले ०.४३.९ हे.आर. क्षेत्र हे आमचे आशिलांचे मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीतील असुन त्यापलिकडे उत्तर दिशेला श्री.जगदीश मधुकर पाटील यांचे मालकीचे उपरोक्त भूमापन क्रमांकापैकी ०.३५.०० हे.आर. इतके क्षेत्र आहे. श्री.जगदीश मधुकर पाटील हे त्यांचे क्षेत्रामध्ये वहिवाट करण्यासाठी केव्हाही आमचे आशिलांचे मिळकतीचा वापर करत नव्हते. आमचे आशिलांचे मालकीच्या उपरोक्त ०.४३.९ हे.आर. क्षेत्रावर आमचे आशिलांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध वा अधिकार नसुन सदर क्षेत्रामधुन कोणाचीही कोणत्याही प्रकारची वहिवाट नाही.

असे असताना आमचे आशिलांचे भाऊ श्री. जगदीश मधुकर पाटील हे आमचे आशिलांचे मिळकतीमधून वहिवाट करत असल्याचे खोटे व खोडसाळ पणे लोकांना सांगत असून त्यांनी आमचे आशिलांचे विरूद्ध मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अलिबाग यांचे न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्र. ९२/२०२५ देखील दाखल केलेला आहे. सदर दावा प्रलंबित असून देखील श्री. जगदीश मधुकर पाटील हे त्यांचे मालकीचे ०.३५.० हे.आर. क्षेत्राची विक्री करण्याचे तयारीत असून त्या मिळकतीकरता आमचे आशिलांचे मिळकतीमधून वहिवाटीचा रस्ता असल्याचे लोकांना सांगत असल्याची खात्रीशीर माहिती आमचे आशिलांना मिळालेली आहे.

त्यामुळे या नोटीसने आमचे आशिल तमाम लोकांना कळवतात की, वर नमुद भूमापन क्र.४२९ मधील आमचे आशिलांचे मालकीच्या ०.४३.९ हे. आर क्षेत्राचा समावेश कोणत्याही दस्तामध्ये वहिवाटीबाबत केल्यास असा दस्त आमचे आशिलांवर बंधनकारक राहाणार नाही व त्याबाबत योग्य ती दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कोर्ट कारवाई आमचे आशिल करतील मग त्यामुळे होणाऱ्या खर्चास व परिणामांस आमचे आशिल जबाबदार राहाणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक ३.९.२०२५
आशिलांची सही

सही/-
**ॲड.अमित महेश्वर देशमुख**
पत्ता-वेधशाळेसमोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.

## महाड नगर परिषद,महाड

**छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन,**
**महाड जि. रायगड, पिन ४०२३०१**

दुरध्वनी व फॅक्स क्रमांक : ०२१४५-२२२३७४ Email : mahadnagarpalika@gmail.com
मुख्याधिकारी (दुरध्वनी) : ०२१४५-२२२२५५ coud.mahad@maharashtra.gov.in

जावक क्र.म.न.प./बांधकाम विभाग/४७३६/२०२५-२०२६ दिनांक:-०३/०९/२०२५

**जाहीर निविदा सूचना सन २०२५-२६**

महाड नगरपरिषद हद्दीतील खालील कामांसाठी ऑनलाईन पद्धतीने टक्केवारी दराच्या ई निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम रु. |
|---|---|---|
| ०१ | महाड नगरपरिषद हद्दीतील डॉ.चेतन सुर्वे घराशेजारील रस्ता तयार करणे.(चौथी मागणी) | ८,८२,६७७/- |
| ०२ | महाड नगरपरिषद हद्दीतील एस.टी.स्टॅन्ड कॉर्नर ते आय.सी.आय.सी.आय बँकेपर्यंत गटार बांधणे. | ३३,११,७६३/- |

तरी सदर कामांसाठी इच्छुक निविदा धारकांनी त्यांच्या निविदा नगरपरिषदेच्या अटी व शर्तीस अधीन राहून http://www.mahatenders.gov.in येथे ऑनलाईन पद्धतीने सादर कराव्यात. निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १२/०९/२०२५ अशी राहील.

सही/-
**(धनंजय कोळेकर)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**महाड नगरपरिषद, महाड**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५



● मु. वायशेत येथील उद्योजक श्री. मेघनाथ पाटील यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे दर्शन घेताना किहीम सरपंच पिंट्या गायकवाड.



● श्री. गोविंद चागू न्हावकर मु. न्हावे-रोहा यांच्या निवासस्थानी विराजमान गणेशमूर्ती. (छायाचित्र- सत्यप्रसाद आडाव)



● किशोर नाईक (बोरगाव-पेण)यांच्या घरी विराजमान झालेले बाप्पा, पेण कोळीवाडा होळी उत्सव देखावा. (छायाचित्र- मुस्कान खान)



● पेणचे उद्योजक राजु सत्यनारायण पिचिका यांच्या घरी विराजमान झालेले इकोफ्रेन्डली बाप्पा. (छायाचित्र- मुस्कान खान, वैशाली मलबारी)



● माणगाव तालुक्यातील नलेफोडी गावचे गणेश तांदळेकर यांच्या निवासस्थानी पुण्याच्या शनिवार वाड्याचा प्रतिकात्मक असा आकर्षक देखावा व सजावट करुन स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र- सलीम शेख, माणगाव)



● किहीम सरपंच पिंट्या गायकवाड यांच्या निवासस्थानी विराजमान गौरी-गणपतीचे दर्शन घेताना उद्योजक मेघनाथ पाटील व इतर



● किहीम सरपंच पिंट्या गायकवाड यांच्या निवासस्थानी विराजमान गौरी गणपतीचे दर्शन घेताना डॉ. श्वेता धवन, महावितरणच्या अधिकारी ज्योती बडे व इतर.



● श्री. सागर दिलीप म्हात्रे, (थळ-पारोडा) त्यांचा घरातील श्री बाल गणेशा व श्री कृष्ण सुदामा भेट.



● माणगाव तालुक्यातील चांदोरे गावचे रहिवासी तथा पंचायत समितीचे माजी सभापती सुजित दिनकर शिंदे यांच्या निवासस्थानी स्थानापन्न करण्यात आलेले गणराय. (छायाचित्र- सलीम शेख, माणगाव)

## नि|व|ड|क

### अमृता भगतचा सत्कार

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील शेलू गावातील रहिवाशी असलेली अमृता ध्यानेश्वर भगत हिचा जिल्हा क्रीडा विभागाच्यावतीने सत्कार करण्यात आला. आंतरराष्ट्रीय पॉवर लिफ्टर असलेली अमृता हिचा राष्ट्रीय खेळ दिवसानिमित्त करण्यात आला. जगातील दर्जाचे हॉकीपटू आणि हॉकीचे जादूगार समजले जाणारे मेजर ध्यानचंद यांचा जन्मदिवस राष्ट्रीय खेळ दिवस म्हणून देशात साजरा केला जातो. त्यानिमित्त रायगड जिल्ह्यातील आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावर कामगिरी करणारे क्रीडापटू यांचा सन्मान करण्याचा जिल्हा क्रीडाधिकारी यांच्या कार्यालयात करण्यात आला. राज्यसभा खा. धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील क्रीडापटू यांचा सन्मान करण्यात आला. त्यात पॉवर लिफ्टिंगमध्ये राष्ट्रीय संघाचे प्रतिनिधित्व करताना दोन आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत यश मिळविणारी कर्जतची अमृता हिचा सन्मान करण्यात आला. अमृता राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ४७ किलो वजनी गटात भारताचे प्रतिनिधित्व केले होते.

### अश्विन प्रशिक्षकाच्या भूमिकेत



**नवी दिल्ली :** भारताचा ऑफ स्पिनर रविचंद्रन अश्विनने २०२४ मध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेटनंतर, आयपीएलमधूनही आपली निवृत्ती जाहीर केली. आयपीएल निवृत्तीनंतर तो विदेशी लीग्समध्ये खेळण्याच्या अफवा पसरल्या होत्या, मात्र आता अश्विनने स्पष्ट केले आहे की प्रशिक्षकपद हा त्याचा पुढील टप्पा असू शकतो. ३८ वर्षीय अश्विनने आपली आयपीएल कारकीर्द चेन्नई सुपर किंग्ससोबत समाप्त केली. माझा पुढील अध्याय कदाचित प्रशिक्षण असू शकतो. मी त्यास खूप महत्वाचे साधन मानतो. मला विश्वास आहे की खेळ मला त्यासाठी तयार करत असल्याचे त्यांनी सांगितले.




### श्रीलंकेचा संघ जाहीर

**नवी दिल्ली :** श्रीलंका क्रिकेटने आशिया कप २०२५ साठी एक सामर्थ्यशाली संघ जाहीर केला आहे. चरिथ असांका संघाचे नेतृत्व करणार आहे. तर मुख्य फिरकीवीर वानिंदु हसरंगाला हॅम स्ट्रिंगच्या दुखापतीनंतरही संघात स्थान देण्यात आले आहे. संघात कुसल मेंडिस, पथुम निर्साका आणि कुसल परेरा हे फलंदाजीचे मुख्य आधारस्तंभ असतील. दासुन शनाका, कामिंडु मेंडिस, डुनिथ वेलालगे आणि चरित असलांका यांसारखे प्रभावशाली अष्टपैलू संघाची ताकद वाढवणार आहेत. चामिका करुणारेत, कामिल मिशारा आणि नुवानिदु फर्नाडी यांच्याकडून श्रीलंकेसाठी निर्णायक कामगिरीची अपेक्षा आहे. तर, दुष्मंथा चमीरा, नुवान तुषारा आणि मथीशा पथिराना हे खेळाडू संघाच्या गोलंदाजीला आणखी धारदार करतील. श्रीलंका संघ : चरिथ असलांका (कप्तान), कुसल मेंडिस (विकेटकीपर), पथुम निसांका, कुसल परेरा, कामिल मिशारा, दासुन शनाका, कामिंदु मेंडिस, वानिंदु हसरंगा, नुवानिदु फर्नाडी, डुनिथ वेलालगे, चामिका करुणारत्ते, महीश तीक्षणा, मथीशा पथिराना, नुवान तुषारा, दुष्मंथा चमीरा, बिनुरा फर्नाडो संघात आहेत.

# आशिया चषकाला उष्णतेचा फटका

## ४० अंशांहून अधिक तापमान, सामन्यांच्या वेळेत बदल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

आशिया चषक स्पर्धेत सुरू होण्यास आता काहीच दिवस उरले आहेत. ९ सप्टेंबरपासून स्पर्धेला सुरुवात होणार असून २८ सप्टेंबरला अंतिम सामना रंगणार आहे. यावेळी भारत आणि पाकिस्तान एकाच गटात असल्याने क्रिकेटप्रेमींमध्ये प्रचंड उत्सुकता आहे. १४ सप्टेंबर रोजी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पार पडणारा भारतपाक सामना रात्री ८ वाजता सुरू होणार आहे. सामन्यांच्या वेळेत बदल आशिया चषक स्पर्धेतील सामन्यांच्या वेळेत मोठा बदल करण्यात आला आहे.

सुरुवातीला सामने भारतीय वेळेनुसार सायंकाळी ७.३० वाजता सुरू होणार होते. मात्र आता १९ पैकी १८ सामने अर्धा तास उशिरा, म्हणजेच रात्री ८ वाजता खेळवले जातील. उष्णतेमुळे ४० अंशांहून अधिक तापमान खेळाडूंच्या सोयीसाठी आणि प्रेक्षकांच्या मागणीनुसार प्रसारकांनी वेळेत बदल मान्य केला आहे. फक्त १५ सप्टेंबर रोजी अबू धाबी येथे होणारा यूएई विरुद्ध ओमान सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ५.३० वाजता खेळवला जाईल. टी फॉरमॅटमध्ये स्पर्धाआशिया चषक स्पर्धेचे सर्व सामने टी-२० फॉरमॅटमध्ये संयुक्त अरब अमिरातीतील अबू धाबी आणि दुबई येथे रंगणार आहेत.




### खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेवर परिणाम

**शारीरिक क्षमतेवर परिणामआशिया चषक २०२५ मध्ये तीव्र उष्णतेमुळे खेळाडूंच्या शारीरिक क्षमतेवर परिणाम होत असल्याने सामन्यांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. संयुक्त अरब अमिरातीमध्ये होणाऱ्या या स्पर्धेतील जवळजवळ सर्व सामन्यांच्या वेळा ३० मिनिटांनी पुढे ढकलण्यात आल्या आहेत.**

## कराटे स्पर्धेत लव्याची सुवर्ण कामगिरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



कराटे स्पर्धेत लव्या राकेश घाडगे हीने घवघवीत यश मिळविले आहे. तिने ब्लॅक बेल्ट मिळविले असून १५ सुवर्णपदकासह आठ रौप्यपदक मिळवून तिने सुवर्ण कामगिरी केली. तिच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

लव्या राकेश घाडगे ही मुलगी अलिबाग तालुक्यातील कुरुळ येथील रहिवासी आहे. शिक्षण घेत असताना अलिबागमधील कराटे अ‍ॅकेडमीमार्फत स्वरक्षणाचे धडे घेत आहे. या अ‍ॅकेडमीद्वारे प्रशिक्षक राहूल तावडे यांच्याकडून हजारो मुले, मुली प्रशिक्षण दिले जात आहे. लव्या ही दहा वर्षाची मुलगी असून कमी वयात कराटेचे चांगले प्रशिक्षण घेऊन ब्लॅक बेल्ट मिळविला आहे.

यापुर्वी तीने १५ सुवर्ण, आठ रौप्य व तीन कास्यपदक पटकावले असून तीन चषक मिळवून यश संपादन केले आहे. २०२१ मध्ये नेपालमधील काठमांडू येथे झालेल्या कराटे स्पर्धेत तीने सुवर्ण व रौप्यपदक मिळविले. तिच्या या कामगिरीचे सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

तिच्या आई, वडीलांकडून मिळालेले प्रोत्साहन तसेच प्रशिक्षक राहूल तावडे यांच्याकडून मिळालेले मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे.

## भारतीय महिला फुटबॉल संघ आशियाई करंडकासाठी पात्र

**। म्यानमार । वृत्तसंस्था ।**

भारताच्या २० वर्षांखालील महिला फुटबॉल संघाने ऐतिहासिक कामगिरी केली. पात्रता फेरीतील अखेरच्या लढतीत म्यानमार महिला संघावर १-० असा विजय साकारत भारतीय महिला संघाने ‘ड’ गटात अव्वल स्थान पटकावले आणि २० वर्षांनंतर एएफसी २० वर्षांखालील आशियाई करंडकाची मुख्य फेरी गाठली. पूजा हिने एकमेव गोल करीत संस्मरणीय विजय मिळवून दिला. याआधी २००६ मध्ये भारतीय महिला संघाने एएफसी आशियाई करंडकाच्या मुख्य फेरीत प्रवेश मिळवला होता. भारतीय महिला फुटबॉल संघाने पूर्वार्धात दमदार खेळ केला. नेहा व शिबानी यांनी तिसऱ्या मिनिटालाच गोल करण्याचा प्रयत्न केला; पण गोल करण्यात अपयश आले. नवव्या मिनिटाला म्यानमारच्या सू सू खिन हिच्याकडून गोल करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. तिलाही गोल करता आला नाही. २७ व्या मिनिटाला भारतीय महिला संघाला विजयी गोल केला.



## महेश्वरीची युरोपमध्ये लक्षवेधी कामगिरी

**। कोल्हापूर । प्रतिनिधी ।**

कोल्हापूरची ४६ वर्षीय ॲथलीट महेश्वरी सरनोबत यांनी युरोपमधील एस्टोनिया (टॅलिन) येथे पार पडलेल्या प्रतिष्ठेच्या फुल आयर्नमॅन स्पर्धेत विलक्षण पराक्रम गाजवला आहे. तब्बल १५ तासांत त्यांनी या कठीण स्पर्धेची यशस्वी पूर्तता करत जागतिक पातळीवर आपली छाप उमटवली.

महेश्वरी यांनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत ३ अत्यंत कठीण टप्पे यशस्वीपणे पार केले. ज्यात ३.८ किमी पोहणे : ५ अंश तापमानाच्या गोठवून टाकणाऱ्या समुद्रात पोहणे, १८० किमी सायकलिंग : प्रचंड थंड हवामानात आणि वादळी वाऱ्यांचा सामना करत लांब पल्ल्याचा प्रवास आणि ४२.२ किमी मॅरेथॉन यांचा समावेश होता. महेश्वरी यांनी हे सर्व टप्पे पार करत फक्त १५ तासांत स्पर्धा पूर्ण केली.



## पुण्याच्या शर्वरीचा कॅनडात डंका

**पिंपरी चिंचवड :** कॅनडातील विनिपेग येथे झालेल्या १८ वर्षाखालील महिला रिकर्व्ह स्पर्धेत पिंपरी चिंचवडची शर्वरी शेंडेने सुवर्णपदक पटकावले आहे.



विशेष म्हणजे तिरंदाजीच्या रिकर्व्ह प्रकारात दक्षिण कोरियाचा मोठा दबदबा असताना शर्वरीने नेमके हे साध्य करून जागतिक युवा स्पर्धेत १८ वर्षाखालील गटात बाजी मारली आहे. त्यामुळे तिच्या या कामगिरीचं सर्वत्र कौतुक होत आहे.

## राशिद खानने रचला इतिहास

**। शारजा । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तानचा लेग-स्पिनर राशिद खानने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नवा इतिहास रचला आहे. तो आता सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज बनला आहे. त्याने न्यूझीलंडच्या टिम साउदीला मागे टाकून हा विक्रम आपल्या नावावर केले आहे. साउदीने १२६ सामन्यांमध्ये १६४ बळी घेतले होते, तर राशिदने केवळ ९८ सामन्यांत १६५ बळी घेण्याची किमया केली आहे. सर्वाधिक टी-२० आंतरराष्ट्रीय बळी घेणारे गोलंदाज : राशिद खान : १६५ बळीटिम साउदी : १६४ बळीईश सोढी : १५० बळीशाकिब अल हसन : १४९ बळीमुस्तफिजुर रहमान : १४२ बळी हे यश राशिदने शारजा येथे संयुक्त अरब अमिराती विरुद्धच्या मालिकेतील तिसऱ्या सामन्यात मिळवले. या सामन्यात त्याने ४ षटकांत २१ धावा देऊन ३ बळी घेतले. कर्णधार म्हणूनही नवा विक्रमया सामन्यात राशिदने कर्णधार म्हणून टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ५० बळी पूर्ण केले. असा पराक्रम करणारा तो जगातील पाचवा कर्णधार ठरला आहे.

# आघाडीमुळे मध्य विभाग उपांत्य फेरीत

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बंगळुरूमध्ये सुरू असलेल्या दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेत मध्ये विभागाने पहिल्या डावातील भक्कम आघाडीच्या जोरावर सेमीफायनलमध्ये प्रवेश मिळवला, मात्र फिरकीपटू कुलदीप यादवला एकही बळी घेता आला नाही ही संघासाठी निराशाजनक बाब ठरली.



उत्तर-पूर्व विभागाने विजयासाठी मिळालेल्या ६७९ धावांच्या अशक्यप्राय लक्ष्याचा पाठलाग करताना संयम आणि जिद्दीची फलंदाजी साकारली. चौथ्या व शेवटच्या दिवशी त्यांनी सहा गडी राखून २०० धावा काढत सामना अनिर्णित राखला. मध्य विभागाने पहिल्या डावात चार विकेट गमावून ५३२ धावा ठोकल्या होत्या आणि प्रतिस्पर्ध्यांना फक्त १८५ धावांत गुंडाळले. त्यानंतर तिसऱ्या दिवशी त्यांनी दुसरा डाव सात बाद ३३१ अशा सुस्थितीत घोषित केला होता.

विजय अशक्य असल्याचे लक्षात घेऊन उत्तर-पूर्व विभागाने पराभव टाळण्यावर भर दिला. कर्णधार रोंगसेन जोनाथन (६० धावा) आणि यष्टिरक्षक जेहू अँडरसन (६४ धावा) यांनी चौथ्या विकेटसाठी ११० धावांची भक्कम भागीदारी करत मध्य विभागाच्या गोलंदाजांची कसोटी पाहिली. अँडरसनने ११ चौकार व १ षटकार लगावला तर अनुभवी जोनाथनने नऊ चौकार मारले.

शेवटच्या क्षणी फिरोजिम जोतिन (नाबाद ९) आणि अंकुर मलिक (नाबाद ५) यांनी बचाव केला. मध्य विभागासाठी हर्ष दुबे, व शुभम शर्मा यांनी प्रत्येकी दोन विकेट टिपले. संघातील मुख्य गोलंदाज कुलदीप यादवने पहिल्या डावात २० आणि दुसरया डावात १२ षटक टाकूनही एकही गडी टिपला नाही. अखेर मध्य विभागाला पहिल्या डावातील आघाडीच्या जोरावर उपांत्य फेरी गाठली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)